बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०

साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे




गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध

आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -११ गोंदिया | अंक ३० | बुधवार,दि.२९ जुन २०२२ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024

# बंडखोर आमदारांना १२ जुलैपर्यंत मुदत



**नवी दिल्ली:** शिवसेना नेते एकनाथ शिंदे यांच्या बंडानंतर राज्यात सत्तासंघर्ष सरू झाला आहे. एकनाथ शिंदे आणि १५ बंडखोर आमदारांविरोधातील अपात्रतेच्या नोटीसविरोधात बंडखोर आमदारांनी दाखल केलेल्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालयाने महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ, महाराष्ट्र विधानसभेचे सचिव, केंद्र आणि इतरांना नोटीस बजावली आहे. तसेच शिवसेना गटनेते अजय चौधरी, पक्ष प्रतोद सुनील प्रभू यांनाही नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांना पाच दिवसांत उत्तर देण्यास सांगितले आहे. १२ जुलैपर्यंत बंडखोर आमदारांवर अपात्रतेसंदर्भातील कोणतीही कारवाई करू नये असा आदेश न्यायालयाने दिला आहे.

महाराष्ट्र विधानसभेच्या उपाध्यक्षांनी शिवसेनेच्या बंडखोर आमदारांना अपात्र ठरवणारी नोटीस बजावली आहे. या नोटिशीविरोधात शिंदे गटाच्या आमदारांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. शिव-सेना विधिमंडळ पक्षाचे २ तृतीयांशपेक्षा जास्त सदस्य आम्हाला पाठिंबा देतात, असा बंडखोर आमदारांचा युक्तिवाद आहे. हे कळल्यानंतरही उपाध्यक्षांनी २१ जून रोजी पक्षाच्या विधिमंडळ पक्षाच्या नव्या नेत्याची नियुक्ती केली. याविरोधात एकनाथ शिंदे गट आणि प्रतोद भरत गोगावले यांनी दाखल केलेल्या याचिकांवर सोमवारी न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जे. बी. पाडीवाला यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली.

विधानसभा उपाध्यक्षांवर अविश्वास ठराव दाखल केला आहे. त्यावर निर्णय होईपर्यंत त्यांना निर्णयाचा अधिकार नाही. त्यांनी बंडखोर आमदारांवर कारवाई केल्यास तो निर्णय घटनाबाह्य असेल, असा युक्तीवाद या वेळी एकनाथ शिंदे गटाच्या वतीने वकील नीरज किशन कौल यांनी केला. बंडखोर आमदारांच्या घरांवर हल्ले होत आहेत. त्यांच्या जीवाला धोका आहे, त्यांच्या बाजूने बहुमत आहे. मात्र त्यांचा आवाज दडपण्याचा प्रयत्न केला जात आहे.

गुवाहाटीतून आमदारांचे मृतदेह परततील, अशी विधाने काही नेते करत आहेत. बंडखोर आमदारांच्या कुटुंबीयांना धोका आहे, असाही ते म्हणाले. तुम्ही आमदारांना धमकी दिली जात आहे, असा सांगत आहात मात्र याची सत्यता तपासण्याचे साधन आमच्याकडे नाही. मात्र विधानसभा उपाध्यक्षांनी बंडखोर आमदारांना दिलेल्या कमी वेळेबाबत आम्ही विचार करु शकतो, असे यावेळी खंडपीठाने स्पष्ट केले.

तर आमदारांना पाठवण्यात आलेली नोटीस ही नोंदणीकृत ईमेल आयडीवर पाठवली गेली नाही आणि ती योग्य ईमेलवरुन पाठवली नाही. ही गंभीर बाब आहे, असा दावा शिंदे गटाची बाजू मांडणारे वकील राजीव धवन यांनी केला. त्यावर न्यायमूर्ती कांत यांनी, मग प्रधान सचिवांनी हे सर्व रेकॉर्डवर ठेवावे, अशी सूचना केली. तुम्ही याप्रश्नी उच्च न्यायालयात का गेला नाही, थेट सर्वोच्च न्यायालयात कशी दाद मागता, असा सवालही सर्वोच्च न्यायालयाने एकनाथ शिंदे गटाला केला.

# आ.अग्रवालांच्या कार्यालयाची शिवसैनिकांकडून तोडफोड




**गोंदिया:** गोंदियाचे अपक्ष आमदार विनोद अग्रवाल यांनी महाविकास आघाडी सरकारविरोधात घेतलेल्या भूमिकेच्या निषेधात शिवसैनिकांनी त्यांच्या कार्यालयाची तोडफोड केली. याविषयीचा व्हिडीओ समोर येताच आ. अग्रवाल समर्थकांनी शिवैनिकांवर गुन्हा दाखल करण्यासाठी आंदोलन सुरू केले. त्यामुळे शहरात तणाव वाढला आहे.

आमदार अग्रवाल यांनी २०१९च्या विधानसभा निवडणुकीवेळी उमेदवारी मिळणार असा विश्वास व्यक्त होत असतानाच काँग्रेसचे आमदार गोपालदास अग्रवाल यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. विद्यमान आमदार असल्याने भाजपने त्यांना उमेदवारी दिली. विनोद अग्रवाल यांनी बंडखोरी करीत गोंदिया विधानसभा मतदारसंघातून अपक्ष दंड थोपटले. गोंदिया विधानसभेत पहिल्यांदा अपक्ष निवडून येण्याचा इतिहास घडविला. यानंतर चाबी संघटना तयार करुन मतदारसंघात कामे केली. यादरम्यान त्यांनी महाविकास आघाडी सरकारला साथ दिली. बदलत्या राजकीय घडामोडीत त्यांनी भाजपला पाठिंबा जाहीर केला. विधानसभा उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांच्याविरुद्ध अविश्वास प्रस्ताव दाखल केला.

भाजप आणि एकनाथ शिंदे यांच्यासोबत आपण असल्याचेही स्पष्ट केले. त्यांच्या या भूमिकेचे गोंदियात पडसाद उमटू ला-गले आहेत. शिवसेनेच्या काही कार्यकर्त्यांनी त्यांनी कार्यालयावर हल्ला करीत तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भातील व्हिडीओ समोर येताच दोषींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यासाठी आ. अग्रवाल समर्थक आक्रमक झाले आहेत. दोन्ही गट आमने-सामने येण्याचा धोका यानिमित्ताने निर्माण झाला आहे. पोलिस परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत.

घटनेची माहिती मिळताच गोंदिया शहर पोलीस घटनास्थळी दाखल झाले. पोलीस अधीक्षक विश्व पानसरे, स्थानिक गुन्हे शाखेचे पो-लीस निरीक्षक बबन आव्हाड, जिल्हा वाहतूक शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश तायडे व गोंदिया शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सूर्यवंशी हजर झाले. त्यांनी चौकशी करून या दगडफेक हल्ला करणाऱ्या आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांची विविध चमू आरोपींच्या शोधासाठी रवाना झाल्या. वेळीच पोलिसांच्या दंगा नियंत्रण पथक दाखल झाले.

गोंदिया शहरातील जुन्या बसस्थानक परिसरात आ. विनोद अग्रवाल यांचे जनसंपर्क कार्यालय आहे. या कार्यालयावर शिवसेनेच्या ५ ते ७ कार्यकर्त्यांनी लाठीकाठीने हल्ला केला. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी विनोद अग्रवाल यांच्या कार्यालयावर हल्ला केल्याचे वृत्त शहर व परिसरात पसरताच आ. अग्रवाल यांचे समर्थक व जनता की पार्टी चाबी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने कार्यालय गाठून घटनेचा तीव्र निषेध केला तसेच शहर पोलीस ठाण्यात जावून आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. महाराष्ट्रात सध्या सुरू असलेल्या राजकीय गोंधळामुळे व आ. विनोद अग्रवाल यांनी भाजपला दिलेल्या पाठिंब्यामुळे शिवसैनिकांनी काठीने कार्यालयावर हल्ला केल्याची चर्चा होती.

## पाण्याचे कॅन रस्त्यावर फेकल्या

आ. विनोद अग्रवाल यांच्या जनसंपर्क कार्यालयावर शिवसैनिकांनी हातमोजे परिधान करून हल्ला केला. यावेळी कार्यालयात सुरक्षेसाठी तैनात असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यासह झालेल्या वादात त्यांनी कार्यालयाबाहेर ठेवलेल्या पाण्याच्या कॅन रस्त्यावर रस्त्यावर फेकल्या.

## मुख्य आरोपीची ओळख?

आ. विनोद अग्रवाल यांच्या कार्यालयावर हल्ला करणाऱ्या आरोपीपैकी मुख्य आरोपी शाहरुक पठान याची ओळख पटली असून त्याला साथीदारासह अटक करण्यात आली आहे. त्याच्यासोबत पाच ते सात आरोपी होते. आ.अग्रवाल यांच्या कार्यालयाचे प्रमुख किशोर कटरे यांनी तक्रार नोंदवली होती.

## राज्यात अलर्ट पण गोंदियात नियोजन नाही

महाराष्ट्राचे राजकारण ढवळून निघाले असताना अख्या महाराष्ट्रात पोलिसांना अलर्ट देण्यात आला. परंतु गोंदिया पोलिसांनी या अलर्टला योग्य पद्धतीने हाताळले नसल्याची चर्चा आहे.

## शिवसैनिकांची दादागिरी, गुंडगिरी खपवून घेणार नाही

कुठलेही कारण वा वाद नसताना शिवसैनिकांनी माझ्या जनसंपर्क कार्यालयावर हल्ला करून तोडफोड केली ही घटना अत्यंत निंदनीय आहे. शिवसैनिकांची ही गुंडगिरी आणि दादागिरी यापुढे मुळीच खपवून घेतली जाणार नाही. अशा प्रकाराचे भ्याड हल्ले करुन शहरातील आणि जिल्ह्यातील वातावरण कलुषित करण्याचे काम केले जात आहे. मात्र, यापुढे असा प्रकार मुळीच खपवून घेतला जाणार नाही वेळ पडल्यास आम्हाला जशाच तशी भूमिका घ्यावी लागेल.

**विनोद अग्रवाल,** आमदार

# मंत्री,राज्यमंत्री यांच्याकडील खात्यांचे फेरवाटप




**मुंबई :** जनहिताची कामे अडकून न राहता ती अविरतपणे सुरू राहण्यासाठी तसेच सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात अतिवृष्टी होणे, आपत्तीच्या घटना अशा परिस्थितीत विभागांची कामे सुरळीतपणे पार पाडण्यासाठी अनुपस्थित पाच मंत्री आणि चार राज्यमंत्री यांच्याकडील खाती इतर मंत्र्यांना सोपविण्याचा निर्णय मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी घेतला आहे.

**मंत्र्यांकडील खातेवाटपात बदल**

एकनाथ शिंदे यांच्याकडील नगर विकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) खाती सुभाष देसाई यांच्याकडे, गुलाबराव रघुनाथ पाटील यांच्याकडील पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग हे खाते अनिल दत्तात्रय परब यांच्याकडे, दादाजी दगडू भुसे यांच्याकडील कृषी व माजी सैनिक कल्याण खाते तसेच संदिपान आसाराम भुमरे यांच्याकडील (रोजगार हमी, फलोत्पादन खाते शंकर यशवंतराव गडाख यांच्याकडे, उदय सामंत यांच्याकडील उच्च व तंत्र शिक्षण खाते आदित्य ठाकरे यांच्याकडे देण्यात आले आहे

**राज्य मंत्र्यांकडील खातेवाटपात बदल**

शंभूराज शिवाजीराव देसाई यांच्याकडील खाती (कंसात) संजय बाबुराव बनसोडे, राज्यमंत्री (गृह ग्रामीण), विश्वजित पतंगराव कदम, राज्यमंत्री (वित्त, नियोजन, कौशल्य विकास व उद्योजकता, पणन, सतेज उर्फ बंटी डी. पाटील, (रा.उ.शु.), राजेंद्र शामगोंडा पाटील यड्रावकर राज्यमंत्री यांच्याकडील खाती (कंसात) विश्वजित पतंगराव कदम, राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण), प्राजक्त प्रसाद तनपुरे, राज्यमंत्री (वैद्यकीय शिक्षण, वस्त्रोद्योग), सतेज उर्फ बंटी डी. पाटील, राज्यमंत्री (अन्न व औषध प्रशासन), आदिती सुनिल तटकरे, राज्यमंत्री (सांस्कृतिक कार्य) यांच्याकडे देण्यात आले आहे. तसेच अब्दुल नबी सत्तार, राज्यमंत्री यांच्याकडील खाती (कंसात) प्राजक्त प्रसाद तनपुरे, राज्यमंत्री (महसूल), सतेज उर्फ बंटी डी. पाटील, राज्यमंत्री (ग्राम विकास), आदिती सुनिल तटकरे, राज्यमंत्री (बंदरे, खार जमिनी विकास, विशेष सहाय्य) यांच्याकडे देण्यात आले आहे. ओमप्रकाश उर्फ बच्चू बाबाराव कडू, राज्यमंत्री यांच्याकडील खाती(कंसात) आदिती सुनिल तटकरे, राज्यमंत्री (शालेय शिक्षण), सतेज उर्फ बंटी डी. पाटील, राज्यमंत्री (जलसंपदा व लाभक्षेत्र विकास, कामगार), संजय बाबुराव बनसोडे, राज्यमंत्री (महिला व बाल विकास), दत्तात्रय विठोबा भरणे, राज्यमंत्री (इतर मागास बहुजन कल्याण) यांच्याकडे देण्यात आले आहे.

# वनहक्क समिती आंदोलकांच्या उपोषणाची सांगता



**अर्जुनी-मोरगाव:** पारंपारिक सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समिती व तालुका महासंघ अर्जुनी/मोर यांनी ४ जून पासून सुरू केलेल्या आंदोलनाची सांगता आमदार मनोहर चंद्रीकापुरे व जि.प. उपाध्यक्ष इंजि. यशवंत गणवीर यांच्या पुढाकाराने झाली आहे. वनविभागाने तेंदु हंगामात पकडलेल्या ट्रक आणि सोबतचा माल पकडून कारवाई केली. त्या कारवाईच्या विरोधात वन हक्क समिती व ग्रामसंघाच्यावतीने वनविभागाच्या विरोधात आमरण उपोषण सुरु करण्यात आले होते. त्या आंदोलनाला घेऊन आमदार चंद्रीकापुरे यांनी मंत्रालयात वन अधिकाऱ्यांशी चर्चा केली. त्यात वनहक्क समिती व ग्रामसभेच्या अधिकाऱ्याची माहिती देत स्थानिक वन अधिकारी त्रास देत असल्याचे लक्षात आणून दिलेत. त्यानंतर आंदोलक व वनअधिकारी यांच्यात झालेल्या वाटाघाटीनुसार २७ जून रोजी उपोषणकर्त्यांना जि.प. उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणविर यांच्या हस्ते निंबुपाणी पाजुन उपोषणाची सांगता करण्यात आली. यावेळी प्र.नि.अधिकारी श्री राऊत, वनपरिक्षेत्र अधिकारी गोठणगाव विजय तेलंग, नवेगा-वचे पोलीस निरीक्षक पांढरे,श्री.दुर्गे रतिराम राणे, अविनाश रहिले, दिलीप खोब्रागडे तथा महासंघाचे पदाधिकारी उपस्थित होते.

उपोषण कर्त्यांमध्ये विन-ोद किरसान,संजयजी ईश्वर, आत्माराम वाटगुरे, दिगंबर मडावी, दुधराम घरतकर, वसंत कुंभरे, परसराम कोवाचे,लालसु मडावी, सुदर्शन नेवारे, रामु कुंभरे तथा सामुहिक वनहक्क व्यवस्थापन समितीच्या सदस्यांचा समावेश होता.

## कॅबीनेटच्या बैठकीत चर्चा

मुंबई-राज्यात सत्तांतराचे वारे वाहत असतानाच आज मुख्यमंत्री उध्दव ठाकरे यांनी मंत्रीमंडळाची बैठक घेत वाढत्या कोरोना रुग्णसंख्येचा आढावा घेतला. त्याचप्रमाणे पिकपरिस्थिती आणि पाणीटंचाईवर सुधद्‌ा चर्चा झाल्याची माहिती मंत्री असलम शेख यांनी दिली.

## जिल्हा नक्षलग्रस्त जाहिर करा-आ.अग्रवाल



**गोंदिया:-** गोंदिया जिल्ह्यातील काही मोजकेच तालुके नक्षलग्रस्त असल्याचे सरकारने जाहिर केले होते.त्यावर गोंदिया विधानसभा मतदारसंघाचे आमदार विनोद अग्रवाल यांनी राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांना पत्र देत संपुर्ण गोंदिया जिल्ह्याच नक्षलग्रस्त जाहीर करण्याची मागणी केली होती. त्या पत्राची दखल गृहमंत्री वळसे पाटील यांनी घेत आमदार अग्रवाल यांचे सदर पत्र गृहविभागाच्या उपसचिवांना कारवाईच्या संदर्भाने पाठविले आहे.

# भाजप-शिंदेसेनेची सत्तास्थापनेची चर्चा!: शिंदे गटाला८ कॅबिनेट,५ राज्यमंत्रिपदे

**मुंबई**-राज्यात शिवसेनेतील ऐतिहासिक बंडाळीनंतर आता पुढच्या अंकाला सुरुवात झाली आहे. शिंदे गटाचं पुढचं पाऊल काय असेल, असाच प्रश्न ज्याच्या त्याच्या मनात आहे. तथापि, सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, बंडखोर शिंदे गट आणि भाजप यांच्या सत्तास्थापनेसंदर्भात खलबते सुरू आहेत. लवकरच राज्यपालांना अविश्वासदर्शक ठराव देण्यासंदर्भात हालचालीही सुरू आहे. माजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हेही दिल्लीला गेले आहेत. अमित शहांची भेट घेऊन सत्ता समीकरणावर चर्चा करणार असल्याची माहिती आहे.

**शिंदे गटाला ८ कॅबिनेट, ५ राज्यमंत्रिपदे?**

माहितीनुसार, शिंदे गटाने भाजपसह सरकार स्थापन करण्यासंदर्भात मंथन केले आहे. यानुसार जर शिंदे गटाने भाजपसोबत सत्ता स्थापन केली. तर शिंदे गटातील ८ जण कॅबिनेट मंत्री आणि ५ जण राज्यमंत्री बनण्याची शक्यता आहे.सूत्रांनुसार, उपमुख्यमंत्रिपदासाठी एकनाथ शिंदे यांचे नाव समोर ठेवण्यात आले आहे. तर गुलाबराव पाटील, शंभुराजे देसाई, संजय शिरसाट, दीपक केसरकर, संजय शिरसाट, उदय सामंत यांना ही मंत्रिपद मिळण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## चला साजरा करुया शाळेचा पहिला दिवस : जिल्हाधिकारी

**गोंदिया :** बालकांचा मोफत व सक्तीचा शिक्षणाचा अधिकार अधिनियम २००९ अंतर्गत ६ ते १४ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना शिक्षणाच्या प्रवाहात आणणे आवश्यक आहे. शाळा प्रवे-शोत्सव अंतर्गत विद्यार्थ्यांचे आनंददायी पध्दतीने स्वागत करावयाचे आहे.

१०० टक्के पटनोंदणी होण्याच्या दृष्टीकोनातून शाळेच्या पहिल्या दिवशी २९ जून ला महसूल विभागातील सर्व अधिकारी तसेच इतर विभाग प्रमुखांनी किमान २ शाळेला भेट द्यावी.

शाळा प्रारंभ दिवस चैतन्यमय आणि उत्साहवर्धक करुन शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिक्षण क्षेत्रातील गुणात्मक वाटचालीसाठी शाळा प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने गती प्रदान करुया.

नव्याने प्रवेशित होणाऱ्या बालकांच्या स्वागतासाठी जिल्हयातील सुसज्य शाळांमध्ये मंगलमय उत्साहाच्या शैक्षणिक वातावरणात विद्यार्थ्यांना प्रवेशित करण्यात येत आहे. या शाळांमध्ये जास्तीत जास्त बालके प्रवेश घेतील याकरिता सर्वांनी सहकार्य करावे. विद्यार्थ्यांचे कौतुक व शिक्षकांना मार्गदर्शन करुन नविन शैक्षणिक वर्षाच्या शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन जिल्हा प्रशासनामार्फत करण्यात येत आहे.

# त्या वनरक्षकाला निलंबित करा

## गावकऱ्यांची मागणी: सलंगटोला,मंदिटोला येथील घटना



**सडक अर्जुनी:** वनपरिक्षेत्र कार्यालय सडक अर्जुनी मधील येणाऱ्या सह वनक्षेत्र कार्यालय कोहमारा मद्ये येनाऱ्या राजगुडा येथील वनरक्षकाला निलंबित करण्याची मागणी गावकऱ्यांनी केली आहे. सलांटोला लगत असलेल्या नाल्याजवळील गट क्रमांक १८५ मधील झुडपी जंगलातील चार सागवान झाडे कापल्या प्रकरणी वनरक्षक दिपक बोधनकर याला निलंबित करण्याची मागणी गावकऱ्यांनी एका लेखी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

सदर गट क्रमांक १८५ मधील चार झाडे कापली आहेत, त्या झाडांची किंमत ३,८५,००१ /- रुपये असल्याची माहिती वन विभागाच्या कर्मचाऱ्यांनी केलेल्या पंचनाम्यात नमूद केली आहे. वनरक्षक बोधलकर याला अवैद्य वृक्षतोडकेल्या प्रकरणात आर्थिक देवाण घेवाण करून सहकार्य के बोलले जात आहे. सदर प्रकरणात एका ठेकेदाराला झाडे कापल्यामुळे त्याच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला, पण त्या वनरक्षकावर कुठलीच कारवाई केली नसल्याची खात्रीलायक माहिती पुढे आली आहे. यात चोर सोडून संन्याशाला फाशी दिल्याचे चर्चा होत आहे.

सदर सागवान झाडाचा पंचनामा करून राजगुडा चे सरपंच मोहन सुरसावत यांच्याकडे सुपूर्त केला आहे. सदर जप्त केलेला सागवान नेण्यासाठी तारीख २६/६ /२०२२ ला काही वनकर्मचारी गेले असता, गावकऱ्यांनी तो सा-गवान उचलण्यास मनाई केली, पहिल्यांदा त्या दोषी वनरक्षकावर कारवाही करा, तरच त्या सागवान मालाची उचल करा, अशी मागणी रेटून धरली आहे. सलाग/टोला, राजगुडा,मंदीटोला परिसरात तील जंगलाची १००% चौकशी केल्यास अवैध वृक्षतोड दिसून येईल. वनविभागाचे फिरते पथक यांची शुधा बघ्याची भूमिका असल्याचे दिसत आहे.

ह्याच परिसरातील जंगलातील सागवान झाडे तोडून काही खासरा प्रकरणात टाकल्याची जोरदार चर्चा आहे. सदर प्रकरण उजेडात येऊ नये म्हणून काही तोडलेले सागवान झाडांची थुटावर माती टाकून लपऊन ठेवले आहेत. तरी संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांनी लक्ष निष्पक्ष चौकशी करून बोधलकर वनरक्षकांला निलंबित करण्याची मागणी लेखलाल टेकाम, मोहन सरसावत, राजविलास परतेकी, लक्ष्मण कुंभरे, तुलसीदास मरस्कोल्हे, राजेश सेडमते, कैलास विठ्ठले आदी गावकऱ्यांनी केली आहे.

# अधिकारी,केंद्रप्रमुखांच्या ७८ जागा रिक्त

## नवीन शैक्षणिक सत्र प्रभारींच्या खांद्यावर शिक्षणाचा मार्ग बिकट

**गोंदिया:** केंद्र आणि राज्य शासन शिक्षणावर अधिक जोर देत आहेत. त्याकरिता विविध उपक्रम, अभियान, कार्यक्रम राबविण्यात येत आहेत. शिक्षणाचा अधिकार कायद्यांतर्गत मोफत आणि सक्तीचा शिक्षण ही संकल्पना अंमलात आणण्यात आली. त्या उद्देशाने शासनाची वाटचाल सरु आहे. असे असताना रिक्त पदांचा भरणा असल्यामुळे शिक्षण विभागाला शासनाचे उद्दीष्ट पूर्ण करण्याकरिता तारेवरची कसरत करावी लागत आहे.

गोंदिया जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागात खुद्द शिक्षणाधिकारी ते केंद्र प्रमुख अशा विविध संवर्गाची तब्बल १४१ पदे मंजूर असताना त्यातील फक्त ७४ पदे भरण्यात आली आहेत. उर्वरित ७७ पदे रिक्त आहेत. एकीकडे शासकीय शाळा टिकविण्यासाठी कसरत होत असताना त्या उद्दीष्टांची पूर्तता करताना यंत्रणेच्या नाकी नऊ येत आहे. दरम्यान मराठी शाळा केवळ नावापुरते उपक्रम राबवून आपली पाठ थोटपण्यात धन्यता मानत आहे. प्रत्यक्षात मात्र गेल्या दोन वर्षांपासून सुरु असलेल्य शाळा बंद करण्याची नामुष्की विभागावर ओढवली आहे. जिल्हा शिक्षण विभाग आजघडीला अधिकारी आणि कर्मचाऱ्यांअभावी पंगू झाला आहे.

प्रभारी अधिकारी नेमून त्यांच्याकडून कामे करवून घेण्यात येत आहेत. परिणामी जरी शिक्षणाच्या आकडेवारीत प्राथमिक शिक्षण विभागाची आकडेवारी साजेशी असली तरी प्रत्यक्षात मात्र स्थिती वेगळीच आहे. या विभागाचे शिक्षणाधिकारी बदलून गेल्यामुळे त्यांचा प्रभार माध्यमिक शिक्षणाधिकारी कादर शेख यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. दोन उपशिक्षणाधिकारी ही पदे मंजूर आहेत. मात्र ती पदे भरली नसल्याने एका पदाचा प्रभार जिल्हा शिक्षण आणि प्रशिक्षण संस्थेचे वरीष्ठ अधिव्याख्याता राजकुमार हिवारे यांच्याकडे देण्यात आला असून एक पद रिक्त आहे. विस्तार जिल्हा शिक्षण विभाग कार्यालयात विस्तार अधिकाऱ्यांची ७ पदे मंजूर असून ५ पदे रिक्त आहेत. पंचायत समिती स्तरावर विस्तार अधिकाऱ्यांची ३० पदे मंजूर असून ६ पदे रिक्त आ-हेत. केंद्र प्रमुखांची ८५ पदे मंजूर असताना ५१ पदे रिक्त आहेत. त्या पदांचा प्रभार शिक्षकांकडे देण्यात आला. परिणामी ते शिक्षक विद्यार्थ्यांना ज्ञानदान करण्याऐवजी बाबुगिरीत व्यस्त झाले.

## अधीक्षकांची ५ पदे रिक्त

विद्यार्थ्यांना मध्यान्ह भोजनाकरिता सकस आहार दिला जा-तो. त्याकरिता शासनाने शालेय पोषण आहार अधीक्षक हे पद मंजूर केले. जिल्ह्यात ९ पदे मंजूर आहेत. त्यातील चक्क ५ पदे रिक्त आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांच्या आहाराचा तपशील, देखरेख, हिशेब ठेवण्याचे काम शिक्षक आणि विस्तार अधिकाऱ्यांवरच आहे. परिणामी ते शिक्षक आणि विस्तार अधिकारी पोषण आहाराचा हिशेब ठेवणार, की शाळेची गुणवत्ता टिकवून ठेवण्याकरिता काम करणार हा कळीचा मुद्दा आहे.



## आठही गटाधिकारी झालेय प्रभारी

गोंदिया जिल्ह्यात प्रत्येक पंचायत समितीत एक गटशिक्षणाधिकारी पद मंजूर करण्यात आला आहे. सर्वच्या सर्व आठ पदे प्रभारींच्या भरवशावर आहेत. यात सालेकसा, आमगाव, गोंदिया मुख्यालय, आमगाव, देवरी, तिरोडा, सडक-अर्जुनी, गोरेगाव, अर्जुनी-मोरगाव येथील पदे रिक्त आहेत.

साप्ताहिक
# बेरार टाईम्स
## निर्भिड, निष्पक्ष लोकप्रिय साप्ताहिक
http://berartimes.com
बुधवार,दि.२९ जुन २०२२


## संपादकीय

# धडपड सत्तेसाठी!

महाराष्ट्रासारख्या पुरोगामी आणि एकेकाळी देशाला मार्गदर्शन करणाऱ्या या राज्यातील सध्याची राजकीय परिस्थिती आता इतकी केविलवाणी झाली आहे की, आता बिहार, उत्तर प्रदेश या अन्य राज्यांकडे बोट दाखविणे म्हणजे विनोदच होईल. कारण एकेकाळी उत्तरेकडील या राज्यांमध्ये अशी राजकीय उलथापालथ घडणे ही विशेष बाब नसे. राज्यात जेव्हा तीन भिन्न विचारधारांचे तीन पक्ष सत्तेसाठी एकत्र आले, तेव्हाच कधी ना कधी यांचे सरकार गटांगळ्या खाणार, हे निश्चित झाले होते. अनेकदा अनेक नेत्यांनी तशी शक्यताही जाहीरपणे वर्तविली होती आणि त्याचा प्रत्यय आता सर्वांनाच येत आहे. राज्यातील सत्ताधारी काँग्रेस आणि राष्ट्रवादी या पक्षांची जातकुळी सारखीच आहे. पण तिसरा पक्ष शिवसेना यांची विचारसरणी ही या दोघांपेक्षा खूपच भिन्न आणि धर्म व भाषिक मुद्द्याला प्रमाण मानणारी असल्याने हे तीन पायांचे सरकार जास्त काळ टिकणार नाही, याची खूणगाठ बांधली गेली होती. या पार्श्वभूमीवर शिवसेनेत या महाविकास आघाडीबाबत अनेक दिवस खदखद सुरूहोती. त्याचा आता भीषण स्फोट झाला आहे, असे म्हणायला हरकत नाही. कारण नेते एकनाथ शिंदे यांनी पुकारलेले बंड आणि दिवसेंदिवस त्याची वाढत जाणारी व्याप्ती पाहता शिवसेना पक्षाच्या अस्तित्वाचाच जणू प्रश्न निर्माण झाला आहे, असे म्हणायला हरकत नाही.

एवढ्या मोठ्या बंडाची पुसटशीही कल्पना पक्षप्रमुखांना किंवा त्यांच्या बगलबच्चांना येऊ नये, ही एका सत्ताधारी आणि सामान्यांशी नाळ जोडलेल्या पक्षाची शोकांतिकाच म्हणावी लागेल. आता एकनाथ शिंदे यांचे बंडच इतके मोठे आहे की, पक्ष वाचविण्याची केविलवाणी धडपड पक्षप्रमुख करीत आहेत. त्यासाठी त्यांना भावनिक साद, आर्जव, विनंत्या आणि मधूनच पुसटश्या धमक्या असा पवित्रा घ्यावा लागत आहे. त्याचा भाग म्हणून मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून शुक्रवारी आपली भूमिका मांडताना पुन्हा एकदा आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

शिवसेना भवनात पक्षाच्या जिल्हाप्रमुखांच्या बैठकीच्या वेळी ठाकरेंनी शिवसैनिकांशी संवाद साधला. हा भाजपचा डाव असल्याचा आरोप त्यांनी केला आहे आणि भाजपसोबत जाण्यासाठी दबाव असल्याचा दावा यावेळी करण्यात आला. मन मोकळे करण्याच्या नावाखाली त्यांनी आपल्या आजाराचे कारणही पुढे केले आहे. त्यातच मुख्यमंत्र्यांचे शासकीय निवासस्थान असलेले "वर्षा' सोडण्याचा उल्लेख त्यांनी केला. "वर्षातून बाहेर पडलो म्हणजे मोह सोडला. पण जिद्द मात्र सोडलेली नाही", असे ते म्हणाले. याचा अर्थ मुख्यमंत्री पदावर अजूनही कायम राहण्याची जिद्द त्यांनी सोडलेली नाही, असेच दिसते. "मेलो तरी शिवसेना सोडणार नाही म्हणणारे पळून गेले", असे म्हणत त्यांनी बंडखोरांना टोला लगावला. पण ही बंडाची आग इतकी मोठी का झाली? ती अशी घातक बनेल, याचे भान का आले नाही? की सत्तेच्या धुंदीत आणि मस्तीत साऱ्याच गोष्टींकडे दुर्लक्ष झाले, असे म्हणण्याची वेळ आता आली आहे.

एकनाथ शिंदेंसोबत काही आमदार गुजरातला गेल्याची माहिती मिळाल्यानंतर अन्य आमदारांना निवासस्थानी बोलावून याबाबत विचारले, तेव्हा त्यांनी काही झाले तरी सोडून जाणार नाही, असे सांगितले होते. पण त्यावेळी उपस्थित असणारे मंत्री दादा भुसे, संजय राठोड हे शब्द देऊनही निघून गेले. हे असे का झाले? याचा विचार करण्यासाठी आता वेळही उरलेला नाही. "आपण भाजपसोबत जावे, यासाठी माझ्यावर काही आमदारांचा दबाव येत आहे", असेही त्यांनी सांगितले. या आमदारांचे त्यात काय चुकले? जी गोष्ट आधीच करायला हवी होती व ती जर केली असती, तर आता जी नामुष्की आली आहे ती ओढवली नसती, हे खरे.

अनेकदा मनधरणी करूनही माघार घ्यायला तयार नसलेल्या बंडखोर आमदारांवर ठाकरे यांनी अक्षरश: आगपाखड केली. "आमच्या विठ्ठलाला बडव्यांनी घेरलेय", असे म्हणणाऱ्या शिवसेना आमदारांचाही ठाकरे यांनी यावेळी समाचार घेतला. "आधी बाळासाहेब विठ्ठल आणि आम्ही बडवे, आता मी विठ्ठल आणि इतर बडवे. हीच गोष्ट उद्या आदित्यसोबतही घडणार नाही का? आदित्यला बडवे म्हणायचे आणि स्वत:चा मुलगा खासदार, हे कसे चालते?", असा सवाल उपस्थित करत त्यांनी एकनाथ शिंदे यांना लक्ष्य केले. "तुम्हाला तुमच्या मुलाला मोठे करावेसे वाटते. मग मला वाटणार नाही का?", असा सवालही विचारला.

यावेळी ठाकरे यांची बंडखोरांची मनधरणी करण्याची केविलवाणी धडपड दिसून आली, तर दुसरीकडे शिवसेनेचे आमदार कुठेही गेले तरी त्यांना राज्यात यावेच लागेल. विधानसभेच्या प्रांगणात आल्यानंतर मला वाटत नाही की, त्यांना आसाम आणि गुजरातचे नेते इथे येऊन मार्गदर्शन करतील. तसेच तिथे गेलेल्या आमदारांनी घेतलेला निर्णय पक्षांतर बंदी कायद्याच्या विरोधात आहे. त्यामुळे त्याचे परिणाम त्यांना भोगावे लागतील. त्याशिवाय त्यांच्या मतदारसंघातही त्याची प्रतिक्रिया उमटेल, असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बंडखोर आमदारांना दिला आहे. आपल्या मतदारसंघातील लोकांना काहीतरी सांगावे, यासाठी निधी मिळत नसल्याची कारणे पुढे केली जात आहेत. अशी परिस्थिती महाराष्ट्राने यापूर्वी पाहिली आहे. त्यामुळे ठाकरे सरकार यावर मात करून विधानसभेत बहुमत सिद्ध करेल आणि ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली सरकार सुरूआहे, हे देशाला कळेल, असे पवारांनी म्हटले होते. बंडखोर आमदारांनी इथे येऊन बोलले पाहिजे, आसाममध्ये राहून नाही, असेही त्यांनी सुनावले. अशा प्रकारे राज्यातील मविआचे सरकार आणि शकले होत असलेली शिवसेना वाचविण्याचे केविलवाणे प्रयत्न सर्वतोपरी सुरू आहेत आणि ठाकरे सरकार शेवटची घटिका मोजत आहे.

## ५५ हजारांच्या कर्जापायी शेतकऱ्याची आत्महत्या

**लाखांदूर:-** राज्यातील मायबाप सरकार सत्ताकारणाच्या डावपेचात गुंतली असताना शेतकऱ्यांच्या अवस्थेकडे दुर्लक्ष होत आहे. या दुर्लक्षामुळे लाखांदूर तालुक्यातील टेंभरी येथील शेतकऱ्यावर अवघ्या ५५ हजारांच्या कर्जापायी आत्महत्येची वेळ आली आहे. देवराम तुळशीराम शिंगाडे (५८) रा. टेंभरी असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे.

देवराम शिंगाडे हे अनेक वर्षापासून शेतीसह पशुव्यवसाय सुद्धा करायचे. यावर्षी तीन एकर शेतात उन्हाळी धानाची रोवणी करून त्यावर जवळपास साठ हजार रुपयांचेवर खर्च केले. दिवसरात्र मेहनत करूनही तीन एकरात केवळ पंधरा पोती धान उत्पादन झाले असल्याने देवराम नैराश्येत गेले होते. चार, पाच दिवसांपासून देवराम गावात तसेच आजूबाजूच्या गावातील ओळखीच्या लोकांकडे जावून भेटले. त्यावेळी त्यांची मानसिकता विचलित झालेली अनेकांना दिसली होती.

सेवा सहकारी संस्थेच्या जवळपास ५५ हजार रूपयांचे कर्ज तसेच धानाचे उत्पादन कमी झाल्याने कर्जदारांचे पैसे कसे द्यायचे, सोबतच पावसाळी धानाचा हंगाम कसा करायचा, या विवंचनेत सापडलेल्या देवराम शिंगाडे यांनी शेवटी आत्महत्येचा मार्ग स्वीकारला. रविवारी दुपारी तीन वाजताच्या सुमारास गावाशेजारी असलेल्या शेतावरील विहिरीत नायलॉन दोरीच्या सहाय्याने गळफास लावून आपली जीवनयात्रा संपविली. देवराम शिंगाडे यांनी आत्महत्या केल्याची माहिती गावात वाऱ्यासारखी पसरली. यावेळी परिसरातील नागरिकांनी एकाच गर्दी केली होती.

लाखांदूर पोलिसांना माहिती मिळताच पोलिस निरीक्षक रमाकांत कोकाटे यांचे मार्गदर्शन पोलिस पथकाने घटनास्थळी जावून घटनेचा पंचनामा केला. देवराम शिंगाडे यांच्यामागे पत्नी व दोन मुले असा परिवार आहे. धानाचे कमी उत्पन्न झाल्याने कर्जाच्या बोझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्याच्या आत्महत्येमुळे गावात हळहळ व्यक्त केल्या जात आहे.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ८०८०८१५३२९ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# ओबीसीचे हितशत्रू कोण?

ओबीसी राजकीय आरक्षणावर डल्ला मारल्यानंतर ओबीसीचा इंपिरीकल डाटा न्यायालयाने तात्काळ मागितला असून, महाराष्ट्र राज्य सरकारची कोंडी केली. ओबीसीचा इंपिरीकल डाटा गोळा करण्यासाठी त्यामुळे मा.जयंतकुमार बांठीया यांच्या अध्यक्षतेखाली आयोग कामाला लागले. हाच समर्पित आयोग, महाराष्ट्रात अनेक ठिकाणी फिरुन ओबीसीची बाजू जाणून घेऊन, अहवालाद्वारे शासनाकडे मांडणार आहे. दरम्यान, समर्पित आयोगाला मोठ्या संख्येने निवेदने देऊन ओबीसीनी दाखवून दिले की, आज ओबीसी जागृत होत आहे. झोपलेल्याला जागं करता येते, झोपेचे सोंग घेतलेल्यांना जाग करता येत नाही हे मिथक ओबीसीसाठी लागू पडणार नाही. हे ओबीसीच्या सद्यस्थितीतील जागृतीवरुनही दिसून येईल. ओबीसी समाजात हजारो जाती आहेत. आणि हिंदुंमधील जातींशिवाय मुस्लिम ख्रिश्चन आदि अन्यधर्मीय मागास यांचा समावेश आहे, भिन्नधर्मीय ओबीसीतील एकोपा विरोधकांची निंद हराम करणारा ठरणार आहे.

ओबीसीची जातवार जनगणना आता कळीचा मुद्दा बनला आहे. जनगणणेच्या मागणीने ओबीसीकरीता लढणा?यांची संख्या वाढत आहे. केवळ संख्या वाढत आहे असे नाही तर ओबीसीच्या न्याय्य हक्काचे शत्रू कोण, ओबीसी मागास का आहे, जातीव्यवस्थेनेच ओबीसीचे कंबरडे मोडले असून, उच्चजातीय शोषकांची बारभाई कारस्थाने ओबीसीच्या लक्षात येत आहे. अशा जागृत, धडपड करणा?या ओबीसी बांधवांची संख्या जसजशी वाढत जाईल तसतसे ओबीसीचे विरोधक मागे सरतील. हा लढा फार जिकरीचा आहे. संयमाने लढला पाहिजे.

मुस्लिम, ख्रिश्चन, शिख,बौद्ध, दलित आदिवासी यांनी आजवर ओबीसीच्या अधिकाराला कधीही विरोध केलेला नाही. तर समर्पित आयोगाला ओबीसींच्या न्याय्य हक्काच्या विरोधात निवेदन देणाऱ्यांचे बिंग फुटले. ओबीसीचे हे खरे हितशत्रू आजचे नाही तर, त्या शत्रुत्वाला दीर्घकालीन ऐतिहासिक पार्श्वभूमी आहे. सांस्कृतिक संघर्षाची परंपरा आहे.




सिंधुजनांची समुद्ध अशी मूळ संस्कृती नष्ट करणारे; बळीराजाला कपटाने मारणारे; महावीर, बुद्ध, चार्वाक यांच्या न्यायी तत्त्वज्ञानाला विरोध करणारे; कबीर, बसवेश्वर, तुकाराम, शिवराय, महानुभाव, वारकरी पासून तर फुले, शाहू पेरियार, आंबेडकर अशा ज्यांनी समतेची न्यायाची बाजू घेतली त्यांना विरोध करणारी छावणी आहे. ज्यांनी ओबीसींसह स्त्रिशुद्रातिशुद्रांचे दमन करण्यासाठी जातीव्यवस्था मजबूत केली. एवढेच नव्हे तर ती व्यवस्था पक्की करण्यासाठी रगड साहित्य निर्मिती केली. 'वेद म्हणजे भेद' अशी परखड चिकित्सा केली जाते, ती काही उगीच नव्हे. वेदांशिवाय मनुस्मृती आणि सर्व स्मृतिग्रंथ, पुराणे धर्मग्रंथ रचून त्यातून ओबीसींवर गुलामी लादली. ती गुलामीची मानसिकता प्रकर्षाने कायम ठेवण्यासाठी, धर्मांधता वाढवण्यासाठी प्रयत्न करत असतात. ओबीसीची बाजू घेणारी अवैदिक विचारधारा दीर्घकाळापासून या विषमता खोरांशी लढा देत आहेत. ओबीसीची जागृती निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्याला कोणाचा विरोध नेहमी होत आलेला आहे हे समजून घेणे ओबीसी आंदोलनाचे पुढील टप्पे असतील.

ओबीसी प्रबोधनाच्या या प्रवाहातील सत्यशोधकी ब्राह्मणेतर चळवळ फार महत्त्वाची ठरते. सत्यशोधकांनी ओबीसी शुद्र-अतिशुद्र- स्त्रिया यांच्या विरोधकांना ओळखले आणि धर्माच्या नावाखाली लुडबुड करणाऱ्या ईश्वर आणि माणूस यांच्या मधल्या दलालापासून सावध राहण्याचे सूत्र मांडले. अशा ओबीसी विरोधकांना दान दक्षिणा देऊ नये, त्यांच्या हातून लग्ने लावू नये, जन्मपत्रिका तयार करू नये, लग्न, ग्रहशांती, लग्नपत्रिका, मुंज, पिंडदान, आदि कार्यातून पुरोहिताला बाद करून ही कृत्ये ओबीसी बहुजनांनी स्वतः केली पाहिजेत. देव आणि उपासकांच्या मधला दलाल हटवा. धार्मिक प्रसंगी पुरोहिताशिवाय कार्य पार पाडा. अशा अनेक गोष्टी ब्राम्हणेतर सत्यशोधकांनी केल्यात. यातून ओबीसींचे धार्मिक स्वातंत्र्य मिळेल. शाहू महाराजांनी वेदोक्त प्रकरणानंतर क्षात्रजगद्गुरुंचे धर्मपीठ निर्माण केले. ओबीसी ब्राह्मणेतरांतील पुरोहितांना प्रशिक्षण देण्यासाठी पुरोहित शाळा सुरू केल्या.

ब्राह्मणेत्तर ओबीसी मधील पुरोहित प्रशिक्षित केले. साहित्याच्या माध्यमातून ब्राह्मणेतरांनी 'स्वयंपुरोहित' सारखा ग्रंथ रचून पुरोहितांची नाकेबंदी करण्यासाठी हिंमत दिली. अनेक धार्मिक प्रसंगी करावयाचे विधी सांगणारे साहित्य निर्माण केले. सत्यशोधक मंगलाष्के, सार्वजनिक सत्यधर्मविधी, सत्यनारायणाच्या पोथीला पर्याय अशी पर्यायी धर्मकृत्ये ओबीसींनी स्वतः करावी यातून विरोधकांना ओबीसींना परेशान करण्याची संधी मिळणार नाही. शोषणाची संधी मिळणार नाही, ही त्यामागील न्यायाची भूमिका होती, हे ध्यानात घ्यायला हवे. अलीकडच्या काळात शिवधर्म संहिता ही त्याचाच अंश वाटेल. सत्यधर्मीय, सत्यशोधकी पद्धतीने, ग्रामगीतेतून, शिवधर्मगाथेतून लख्ख केलेल्या अनेक अवैदिक परंपरा ओबीसी-ब्राह्मणेतरांचा धर्मस्वातंत्र्यांचा लढा अधिक मजबूत करणाऱ्या वाटतील. आपली निखळ संस्कृती जी कृषिजीवनाशी संन्निध आहे. श्रमसंस्कृतीशी तादात्म्य पावलेली आहे. लोकजीवनाचा झुळझुळ वाहणारा निरंतर प्रवाह आहे. ही संस्कृती आपल्याला या धर्मस्वातंत्र्याशिवाय लाभणार नाही. त्यासाठी सांस्कृतिक परिवर्तन ही खरी यापुढे लढाई असली पाहिजे. आज ओबीसी ज्या आतुरतेने या परिवर्तनवादी वातावरणात प्रविष्ट होत आहे. त्याला आपल्या निखळ समतावादी प्रवाहात सामील होण्याची ही फार मोठी संधी आहे.

ओबीसींचे विरोधक हे अस्सल विषमतावादी आहेत. "ब्राह्मणेतरांपेक्षा तेच स्त्रियांना कमी लेखतात. स्त्री शिक्षणाला त्यांनी विरोध केला. त्यांनी स्त्रीजातीला हीन ठरवले. आई बहिणी लेकी सुना यांच्याविषयी पुरातन काळापासून संशय घेतलेला आहे. हे विरोधक इराणमधून आलेले आर्य असून त्यांना धर्म नाही. भाषा नाही. धर्माचे ढोंग करून आमचे अन्न खाऊन आम्हास कनिष्ठ समजतात. आमच्यात तंटे लावतात. मंदिरातील मूर्तींना शिवू देत नाही. तीर्थाच्या ठिकाणी लुटतात. आमची दक्षिणा, आमचे अन्न खाऊन आम्हाला ते कनिष्ठ समजतात.' अशी वास्तव मांडणी जवळकर करतात, त्याची प्रासंगिकता समजली पाहिजे.

ओबीसी आरक्षणाला विरोध करण्यासाठी ज्या जातींनी त्यांच्या जातीच्या नावानिशी असलेल्या लेटरपॅडवर निवेदने दिलीत त्यावरून ओबीसींचे हितशत्रू आता ओबीसींना नव्या स्वातंर्त्यासाठी विचार करायला भाग पाडत आहेत. याचीही बूज राखली पाहिजे.

**-अनुज हुलके**

# बाजारपेठेत मागणी असलेल्या पिकांचे उत्पादन घ्यावे- श्याम तागडे




**गोंदिया :** शेतकरी आपल्या शेतात विविध प्रकारच्या पिकांचे उत्पादन घेत असतात. परंतू काही पिकांच्या उत्पादनाची बाजारपठेत पाहिजे त्या प्रमाणात मागणी होत नाही. त्यामुळे शेतकऱ्यांनी ज्या पिकांची बाजारपेठेत मागणी आहे त्याच पिकांचे उत्पादन घ्यावे, असे प्रतिपादन जिल्ह्याचे पालक सचिव श्याम तागडे यांनी केले.

महिला आर्थिक विकास महामंडळ व कृषि विभाग गोंदिया यांच्या संयुक्त विद्यमाने माविम जिल्हा कार्यालयातील सभागृहात महिला कौशल्य विकास कार्यशाळेच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, जिल्हा अक्षिक कृषी अधिकारी हिंदूराव चव्हाण, माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर, केव्हीकेचे सय्यद अली प्रामुख्याने उपस्थित होते.

श्री. तागडे पुढे म्हणाले, प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेत १० लाखापर्यंत अनुदान आहे. त्यामुळे या योजनेचा महिला बतचगटांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा. प्रत्येक पाच वैयक्तिक व एका गटाचे लक्ष्य निर्धारित करुन ङ्जे पिकेल ते विकेलफ या आधारे व्यवसाय सुरु करावे. कृषि संजीवनी ही योजना ग्रामीण विकासासाठी मोठी लाभदायक ठरणार आहे. यासाठी कृषी तसेच विविध विभागांनी गाव स्तरावर शेतकऱ्यांसोबत प्रत्यक्ष चर्चेच्या माध्यमातून उद्योग प्रक्रियाचे नियोजन करुन मार्गदर्शन करावे. "एक जिल्हा एक उत्पन्न' या आधारावर मोठ्या प्रमाणात भात व भाजीपालाचे उत्पादनात वाढ करुन कुटूंबाचे उत्पन्न वाढविण्याची मोठी संधी बाजारपेठेत उपलब्ध आहे, त्याचा लाभ घ्यावा. माविमच्या माध्यमातून बचतगटाच्या महिलांनी कर्ज घेऊन ९९ टक्के कर्जाची परतफेड केली आहे त्याबद्दल पालक सचिवांनी शुभेच्छा दिल्या.

जिल्हाधिकारी नयना गुंडे म्हणाल्या, जिल्ह्याचा मानव विकास निर्देशांक वाढविण्यासाठी आरोग्य, शिक्षण, उत्पन्न यावर भर देऊन जास्तीत जास्त महिलांनी उत्पन्न वाढीसाठी सहभागी व्हायले पाहिजे. जिल्ह्यात माविम मार्फत दुग्ध वाढीसाठी यावर्षात ९० दूध संकलन केंद्र उभारण्याचे लक्ष्य घेण्यात आले आहे. सद्यस्थितीत तिरोडा तालुक्यात माविम व अदानीच्या माध्यमातून २५ दुग्ध संकलन केंद्र सुरु आहेत. याद्वारे आतापर्यंत ४ लक्ष १५ हजार लिटर दुधाचे संकलन करण्यात आले आहे असे त्यांनी सांगितले.

मुख्य कार्यकारी अधिकारी श्री पाटील म्हणाले, शासनाकडून ज्या योजना सुरु आहेत त्याची पुरेपूर माहिती आपल्याला असायला पाहिजे. प्रकल्प काय आहे याची माहिती करुन घ्यावी, तरच प्रकल्प सिध्दीस जाईल. उत्पादित वस्तुंची पॅकेजिंग, प्रोसेसिंग व मार्केटिंग या तीन गोष्टींकडे विशेष लक्ष्य देऊन आपले उत्पन्न वाढवावे असे सांगितले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते कर्ज मंजूरीचे आम्रपाली महिला बचतगट गोंदिया यांना ६ लक्ष ५० हजार रुपयांचा धनादेश व उन्नती महिला बचतगट कारंजा यांना १० लक्ष रुपयांचा धनादेश वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी हिंदूराव चव्हाण यांनी केले. संचालन तालुका कृषी अधिकारी धनराज तुमडाम यांनी केले. उपस्थितांचे आभार माविमचे जिल्हा समन्वय अधिकारी संजय संगेकर यांनी मानले. कार्यक्रमास जिल्ह्यातील बचत गटाच्या प्रतिनिधी, उपजिविका सहयोगिनी, उद्योग सखी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सतीश मार्कंड, प्रदिप कुकडकर, प्रफुल अवघड, हेमंत मेश्राम, राम सोनवने, सीएमआरसी स्टाफ यांनी सहकार्य केले.

# निरंतर प्रयोगशिलातून आंबा पिकात भरारी



**अर्जुनी/मोरगाव :** तालुक्यापासून १२ कि.मी. अंतरावर आदिवासी बहुल क्षेत्र असलेले धाबेटेकडी/आदर्श गाव. येथील शेतकरी कुटूंबाची पार्श्वभूमी असलेले ललित शंकर सोनवाने हे गेल्या १५ वर्षापासून प्रयोगशील शेती करीत आहेत. तीन एकर शेती असलेले सोनवाने नवनविन तंत्रज्ञानाचा अवलंब करीत आहेत. भात बहुगल पट्ट्यात भात पिकाबरोबर बहुवार्षिक आंबा फळपिकाची लागवड करुन त्यांनी जोपासलेल्या बागेतून उत्कृष्ट स्वाद, गुणवत्तापुर्वक दर्जेदार चवीच्या आंब्याचे उत्पादन घेत आहेत.

श्री सोनवाने हे सुरुवातीस पारंपारीक भात पिकाचे उत्पादन घेत असत. कृषी विभागाच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी विविध अभ्यास दौरे, चर्चासत्र, शिवार भेट, विद्यापिठे, कृषी संशोधन केंद्र यामध्ये सहभागातून बहुवार्षिक फळपिक पध्दतीचा अभ्यास केला. कृषी विषयक ज्ञान वाढविने हा त्यांचा छंद व प्रगतीचा आत्मा आहे.

एकदा लागवड केल्यानंतर हमखास उत्पन्न मिळेल यासाठी त्यांनी आंबा पिकाची निवड करुन एक एकर क्षेत्रावर घन पध्दतीने १० बाय ४ फुट अंतरावर केशर, दशेरी, लंगडा, मल्लीका, हापुस इत्यादी जातीची ७५० कलमांची लागवड केली. लागवडीपासून तीन वर्षानंतर आंबा उत्पादन सुरु झाले. सुरुवातीस उत्पादन कमी होते. परंतू आता प्रत्येक झाडापासून त्यांना सरासरी १५ ते २० किलो फळे मिळतात, त्यामध्ये केशर आंब्याला दर चांगला मिळतो. खते, मजुरी, तनव्यवस्थापन यासाठी हंगामी कामासाठी त्यांना १५ ते २० हजार खर्च येतो. उपलब्ध नैसगीक स्त्रोताचा वापर अधिक असल्याने खर्च मर्यादीत करण्यावर भर असतो.

सेंद्रीय पध्दतीने आंब्याचे उत्पादन घेत असल्याने रासायनिक खताचा वापर कमी करुन खर्चात बचत करता येते, तसेच वेळोवेळी छाटणी केल्याने मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवाड्यापासून फळाची काढणी सुरु होऊन दर्जात्मक गुणवत्तापुर्वक फळाचे उत्पादन मिळाले. त्यांना यावर्षी १२ क्विंटल आंबा फळाचे उत्पादन झाले असून त्यांनी स्वत: नैसगीक पध्दतीने आंबा पिकवून स्थानिक पातळीवर प्रतवारी व पॅकींग करुन स्वत: घरपोच विक्री केल्याने सरासरी १०० ते १०२ प्रति किलो या प्रमाणे दर मिळाला.

श्री सोनवाने यांच्या फळबागेस आतापर्यंत नागपूर विभागाचे विभागीय कृषी सहसंचालक रविंद्र भोसले, जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी हिंदूराव चव्हाण, उपविभागीय कृषी अधिकारी मंगेश वावधने व कृषी विभागातील अधिकारी, कर्मचारी व परिसरातील शेतकरी फळबागेस भेटी देऊन श्री सोनवाने यांच्या प्रयोगशील शेतीचे कौतुक केले आहे.

# आपत्ती व्यवस्थापन काळाची गरज



पूर्वीच्या काळात येणारी संकटे ही बहुतांश नैसर्गिक असत.मानवाने प्रगतीला जसजशी सुरुवात केली तसतशी संकटेही वाढू लागली. मानवाने आपली प्रगती करताना निसर्गाच्या व्यवस्थेत ढवळाढवळ करायला सुरूवात केली. त्यामुळे मानव आणि निसर्ग यांच्यामध्ये गुंतागुंत अधिकच वाढत गेली. वाढती लोकसंख्या आणि प्रगती करताना निसर्गाच्या मार्गात आणलेल्या अडथळ्यामुळे निसर्गनिर्मित आणि मानवनिर्मित अशी दुहेरी संकटे निर्माण झाली.

नैसर्गिक आपत्ती आणि मानवनिर्मित आपत्ती हे दोन आपत्तीचे प्रकार आहेत. नैसर्गिक घडामोडीतून घडणाऱ्या आपत्ती ह्या नैसर्गिक असतात. मानवांच्या विशिष्ट कृत्यातून घडणाऱ्या आपत्ती ह्या मानवनिर्मित असतात. महापूर, वाळू-वादळ,हिम-वादळ, धूळ-वादळ, चक्रीवादळ, भूकंप, ज्वालामुखी, त्सुनामी, भूस्खलन, वीज कोसळणे, धुके पडणे, उष्ण व शितलहर, दुष्काळ, संसर्गजन्य रोग, कीड व उल्कापात ह्या नैसर्गिक आपत्ती आहेत. मानव निर्मित आपत्तीमध्ये अपघात, आग, वणवा, दरोडा, वायुगळती, तेलगळती, कारखाना व खाणीतील विस्फोट, युद्ध, चेंगराचेंगरी, अणुस्फोट जैविक अस्त्रांचा स्फोट, बॉम्बस्फोट, इमारत कोसळणे, हत्या दहशतवाद, गुन्हेगारी, अणुभट्टीतील किरणोत्सर्ग, माहिती तंत्रज्ञानाशी संबंधित गुन्हेगारी आणि त्यामधून उदभवणारी संकटे आदींचा यामध्ये समावेश करता येईल. आपत्तीचे परिणाम हे मानवी जीवनावर दूरगामी असतात. आपत्तीमुळे जीवित व वित्तीय नुकसान होते. आपत्तीमुळे पर्यावरणात असंतुलन निर्माण होते.आपत्तीमुळे मानवी जीवनात अडथळे निर्माण होतात. कोरोनासारख्या आपत्ती मानवी जीवन तर उध्वस्त करतातच सोबत अर्थव्यवस्थेवर देखील परिणाम करतात. नैसर्गिक किंवा मानवनिर्मित आपत्तीवर जर काही प्रमाणात मात करायची असेल, तिची तीव्रता कमी करायची असेल तर मानवाला आपत्तीचे व्यवस्थापन करणे अत्यंत महत्वाचे आहे.

वाढत्या लोकसंख्येची घनता ही प्रदेशाच्या परिस्थितीत बिघाड घडविण्यास मानव कारणीभूत ठरला आहे. भूकंप, नद्यांना येणारे पूर यामुळे होणारी जीवितहानी लोकसंख्येच्या घनतेमुळे मोठी असते.विकासाच्या मागोमाग आपत्तीचा धोका अधिकाधिक वाढतांना दिसत आहे. मानवी जीवनामध्ये आपत्ती हा एक अविभाज्य घटक झाला आहे.ती अटळ आहे. मात्र ती ओढवू नये यासाठी प्रत्येकाने सावधगिरी बाळगली पाहिजे. आपत्ती जर ओढवली तर तिचा प्रतिकार करणे हे आपले प्रत्येकाचे कर्तव्य आहे. आपत्तीची तीव्रता कमी करता येते. आपत्ती निवारण ही कोणा एकाची जबाबदारी नसते. सरकार, शासन यंत्रणेतील सर्व घटक, उद्योगपती, विविध व्यवसायिक, विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था,विविध समुह आणि आपत्ती व्यवस्थापनाच्या सर्व टप्प्यातील सर्व क्रियांमध्ये सामान्य माणसाचा संपूर्ण सक्रीय सहभाग असणे महत्त्वाचे आहे. आपत्तीच्या काळात कोणती ना कोणती तरी जबाबदारी ही प्रत्येकाला किंवा समूहाला घ्यावीच लागते. तरच आपण आपत्तीचे निवारण यशस्वीपणे करू शकतो.

आपत्तीपूर्व व्यवस्थापन, आपत्कालीन व्यवस्थापन आणि आपत्ती नंतरचे व्यवस्थापन हे आपत्ती व्यवस्थापनाचे महत्वाचे तीन टप्पे आहे.आज विज्ञानाने मोठी प्रगती केली आहे. अवकाशात सोडलेल्या उपग्रहांमुळे संभाव्य आपत्तीच्या भागांमध्ये धोक्याची पूर्वसूचना देण्यात येते. त्यामुळे आपत्ती कोसळल्यावर कमीत कमी नुकसान होते.उदाहरण दयायचे झाल्यास वादळ येणार असल्याने मासेमारांनी मासेमारीसाठी समुद्रात जाऊ नये. तसेच समुद्र काठावर राहणाऱ्या नागरिकांना आवाहन करण्यात येते.त्यामुळे आपत्तीचा मुकाबला करण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्यात हे ठरविता येते.आपत्ती निवारणासाठी सुयोग्य संघटन निर्माण करण्यात येते.

आपत्कालीन व्यवस्थापन हा आपत्ती व्यवस्थापनाचा महत्वाचा टप्पा आहे. यामध्ये बचाव आणि शोध हा मार्ग आहे. यामध्ये आपत्ती पीडितांना त्या आपत्तीमधून सोडविण्यासाठी मदत केली जाते. यासाठी असलेल्या आपत्ती व्यवस्थापन दलाकडून आपत्तीग्रस्तांना त्वरित प्रतिसाद देण्यात येतो. त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी काम करण्यात येते. शासन प्रशासन यंत्रणेच्या जोडीने आपत्तीपूर्व, आपत्ती दरम्यान आणि आपत्ती पश्चात कोणकोणती कामे करावीत त्याचे नियोजन करते. केंद्र सरकार, राज्य सरकार आणि जिल्हापातळीवर जिल्हा प्रशासनाची स्वतंत्र यंत्रणा काम करीत असते. प्रत्येक पातळीवर प्राधिकरणाचे अधिकार, कार्यकक्षा आणि जबाबदाऱ्या निश्चित केलेल्या असतात. त्यांचे अधिकार आणि जबाबदाऱ्या देखील निश्चित केल्या जातात. अधिकार आणि जबाबदाऱ्यांचे काटेकोरपणे विभागणी झालेली असते. मंत्री आणि सचिव यांच्या पातळीवर निर्णय घेतले जातात.त्याची अंमलबजावणी अधिकाऱ्यांपासून ते अखेरच्या पातळीवरील शासन यंत्रणेला जिल्हाधिकाऱ्यांच्या नियंत्रणाखाली कार्य करावे लागते. निसर्गनिर्मित आपत्ती टाळता येणार नाही.परंतु मानवनिर्मित आपत्ती टाळणे,तिची तीव्रता कमी करणे व त्यापासून होणा?या हानीचे प्रमाण नक्कीच कमी करता येणे शक्य आहे.

येणाऱ्या आपत्तीची चाहूल जर आपल्याला आधीच लागली तर त्याबाबत लोकांना वेळीच सावध करणे, होणारी हानी कमी करणे शक्य आहे. वैज्ञानिक प्रगतीमुळे आणि अवकाशात सोडलेल्या उपग्रहांमुळे आता त्सुनामी, वादळे, गारपीट, अतिवृष्टीचा अंदाज घेणे शक्य झाले आहे. पूर्व अंदाज घेऊन लोकांना त्याविषयी आधीच कल्पना देता येते. प्रशासन यंत्रणा कार्यक्षमतेने काम करीत असताना आणि लोकांनी अतिउत्साही न होता योग्य संयम दाखवून प्रशासनाला प्रतिसाद दिला तर आपत्तीवर मात करणे शक्य आहे.

आपत्ती निवारण व्यवस्थापनात जनतेशी योग्य प्रकारे संवाद साधून त्यांच्या मनातील भीती नाहीशी करणे हे नियंत्रण आणि कार्यक्षम अंमलबजावणीत महत्त्वाचे आहे. संपर्क यंत्रणेची भूमिकाही महत्त्वाची असते. आपत्ती व्यवस्थापन ही आज काळाची गरज झाली आहे. आपत्तीत आलेला प्रसंग निवारण्यासाठी सर्वाधिक गरज असते ती साधनसामग्रीची. आपत्तीतून लोकांचा बचाव व त्यानंतर त्यांचे पुनर्वसन करण्यासाठी विविध प्रकारची साधनसामग्री आवश्यक असते. कोणत्या प्रकारची, कीती साधनसामुग्री हवी व ती तात्काळ कोठून मिळविता येईल याबाबतची माहिती नियंत्रण कक्षाजवळ असावी.नसली तर ती त्यांनी तात्काळ कोठून मिळविता येईल याबाबतची माहिती नियंत्रण कक्षाजवळ असली पाहिजे. जसे पोहणाऱ्या व्यक्तींची, सर्प मित्रांची, बिछायत केंद्र, सेवाभावी संस्था, दानशूर व्यक्तींची,रुग्णवाहिकांची आणि डॉक्टरांची अद्ययावत यादी आणि त्यांचे संपर्क क्रमांक उपलब्ध असले पाहिजे. आपत्तीत सापडलेल्या लोकांचे लवकरात लवकर स्थलांतर करून त्यांना सुरक्षित ठिकाणी आणून व त्यांच्या कुटुंबातील व्यक्तीची रीतसर नोंद घेतली पाहिजे. आपत्तीतून बाहेर पडण्यासाठी व पुनर्वसनासाठी करावयाच्या गोष्टी या वेगवेगळ्या परिस्थितीनुसार असतात.

आपत्ती लहान अथवा मोठी असली तरी तिच्या नियंत्रणासाठी कितीही पूर्वतयारी केली तरीही आपत्तीच्या प्रसंगी ती कमीच असते.अचानक आलेल्या आपत्तींना तोंड देण्यासाठी तिथे आलेले नागरिकच शासकीय यंत्रणेला मदतीसाठी सर्वप्रथम धावून जातात. आपत्तीच्या प्रसंगी नागरिकांनी दाखविलेली एकजूट महत्त्वाची ठरते. आपत्तीबाबत पूर्वतयारी, आपत्तीचा सामना करणे व आपत्तीनंतरचे पुनर्वसन याबाबत लोकशिक्षण देणे आवश्यक आहे. तसेच पुरेशी पूर्वसूचना देणे आवश्यक आहे. आपत्तीच्यावेळी गोंधळाची स्थिती जितकी कमी असेल तितके तिचे प्रमाण कमी असते, तितकी परिस्थितीही लवकर पूर्ववत होण्यास मदत होते. यावर आपत्ती निवारणाचे यश अवलंबून आहे.

**विवेक खडसे,**
**जिल्हा माहिती अधिकारी,**
**वाशिम**

# तालुक्यात शेततळ्याच्या नावाखाली दगडाचे अवैध उत्खनन

## अवैध उत्खनन सुरु असल्याचा धक्कादायक प्रकार ....



**देवरी:-** शेततळ्याच्या नावाखाली देवरी तालुक्यात मोठ्या प्रमाणावर मुरुम आणि दगडाचे अवैध उत्खनन सुरु आहे. देवरी शहराच्या दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या शिरपुर/बांध परिसरात असाच अवैध उत्खनन सुरु असल्याचा प्रकार समोर आला आहे. मागील अनेक महिन्यांपासून येथे अवैध दगडाचे उत्खनन सुरु आहे. यामध्ये येथील खडीक्रशर आणि शेत मालकांनी दिवसाढवळ्या महसूल विभागाच्या डोळ्यात धुळफेक करत कोट्यावधी रुपयांची टोपी घातली आहे.

सरकारने शेततळे तयार करण्यासाठी माती आणि दगडाचे उत्खनन करण्यास काही अटी आणि शतीवर शेतकऱ्यांना परवानगी दिली आहे. शासनाच्या या सवलतींचा अनेक शेतकरी आणि खडीक्रशर चालकांनी गैरफायदा घेतला आहे. असाच एक प्रकार शिरपुर/बांध येथे समोर आला आहे. येथील शेतक?यांच्या जमिनीमध्ये गेल्या अनेक महिन्यांपासून अवैध उत्खनन सुरु आहे. येथील जमिनीतून उत्खनन करुन करोडो रुपयाचा महसुल काढण्यात आला आहे. दगड खडी क्रशरसाठी वापरला जात आहे.

उत्खनन करण्यासाठी भुसुरुंगाचाही वापर केला जात आहे. बेकायदेशीर उत्खननामुळे या परिसरात पर्यावरणाचा प्रश्न ही या निमित्ताने ऐरणीवर आला आहे. विनापरवाना सुरु असलेल्या येथील अवैध उत्खननामुळे अनेक खडीक्रशर मालक मालामाल झाले आहे. शिरपुर/बांध येथे सुरू असलेले खडीक्रशर हे मुरदोली येथील अग्रवाल कंन्ट्रक्सन कंपनीचे असल्याचेही बोलले जात आहे.

हा सगळा प्रकार गेल्या अनेक महिन्यांपासून बिनबोबाट सुरु असतानाही महसूल प्रशासन मात्र डोळे मिटून गप्प का..? शिरपुर/बांध येथिल स्थानीक तलाठी निन्द्रां अवस्थेत आहेत का..?असा सवालही या भागातील नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे. तालुक्यात सुरु असलेल्या अवैध उत्खननाला कोणाचे अभय आहे, याचा शोध घेवून संबंधीत शेतकरी आणि खडी क्रशर मालकांवर कडक कारवाई करावी, अशी मागणी आता जोर धरु लागली आहे.

# जि.प.उपाध्यक्ष गणवीर आरोग्य व शिक्षण,टेंभरे अर्थ/बांधकाम तर कुथेकडे कृषी व पशुसंवर्धन

**गोंदियाः-** गोंदिया जिल्हा परिषदेच्या २४ जून रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेच्या बैठकीत जिल्हा परिषद अध्यक्ष पंकज रहांगडाले यांनी विषय समिती सभापतींच्या खातेवाटपाची घोषणा केली. विशेष म्हणजे सभापतीपदी निवड झाल्यानंतर तब्बल एक महिन्यांनी हे खाते वाटप झाले असून जिल्हा परिषदेच्या इतिहासात पहिल्यांदाच घडले आहे. जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंजि.यशवंत गणवीर यांच्याकडे आरोग्य व शिक्षण विभागाचे सभापती पद देण्यात आले. तर संजय टेंभरे यांना अर्थ व बांधकाम विषय समितीचे सभापती पद देण्यात आले आहे. सोनु कुथे यांच्याकडे कृषी व पशुसंवर्धन विषय समितीचे सभापती देण्यात आले आहे.



विशेष म्हणजे टेंभरे यांना अर्थ व बांधकाम विषय समिती न देण्यावर भाजपच्या नेत्यांचे मत होते, त्यावरुनच ७ जून रोजीची पहिली सर्वसाधारण सभा स्थगित करण्यात आली होती. मात्र अखेर टेंभरे यांच्याकडेच सदर विषय समितीचे सभापतीपद गेल्याने चर्चेतील विषय संपुष्ठात आला असला तरी मनात निर्माण झालेले मतभेद व मनभेद हे अडीचवर्ष कायम राहतील अशी चर्चा आहे. विषय समितीच्या सभापतीपदासोबतच विषय समिती सदस्यांचीही निवड बैठकीत करण्यात आली आहे.

# आमदार चंद्रिकापूरेंनी घेतली अन्न पुरवठा विभागाच्या सचिवांची भेट

**अर्जुनी मोरगाव :-** गोंदिया जिल्हयातील उन्हाळी रब्बी पिकाचे धान खरेदीची मर्यादा वाढवून मिळावी यासाठी शेतकऱ्यांच्या वतीने वारंवा मागणी केंद्र सरकारकडे करुनही दखल न घेतल्यामुळे गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्याकडे लाखो क्विंटल धान पडून आहे.

धान खरेदी केंद्राकडून थोड्या शेतकऱ्याकडील धानाची खरेदी झाल्यामुळे बऱ्याच शेतकऱ्याकडे घरी धान पडून असल्याने पावसाळी पिक घेण्यासाठी शेतकऱ्याकडे पैसा नाही. केंद्र सरकार दखल घेत नाही म्हणून २४ जून २०२२ रोजी मुंबई मंत्रालय येथे आमदार मनोहर चंद्रिकापुरे यांनी अन्नपुरवठा विभागाचे सचिव विजय वाघमारे यांची भेट घेत चर्चा केली.तसेच उन्हाळी रब्बी धान खरेदीची मर्यादा मुदत वाढीसाठी राज्य सरकार मार्फत केंद्र सरकारला प्रस्ताव सादर करण्यात यावे अशी विनंती आमदार चंद्रिकापुरे यांनी केली.



# विद्यार्थ्यांनी आवडीच्या कार्यक्षेत्रात प्रगती करावी




## ■ जिल्हाधिकारी नयना गुंडे
## ■ सामाजिक न्याय दिन व विद्यार्थ्यांचा सत्कार

**गोंदिया :** सामाजिक न्याय दिनाचे औचित्य साधून माणसाला समाजातील सर्व घटकांचा मुख्य घटक मानला जातो. यामुळे समाजातील मानव हा सर्व श्रेष्ठ समाजशील प्राणी आहे. त्यामुळे समाजाचा घटक या नात्याने आपली प्रगती सर्व क्षेत्रात करावी, जे आवडीचे क्षेत्र आहे, त्याला प्रथम प्राधान्य द्या. आवडीच्या क्षेत्रात परिश्रम व अभ्यास करून नाव उज्वल करा, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी श्रीमती नयना गुंडे यांनी केले. त्या सामाजिक न्याय दिन व विद्यार्थ्यांचा सत्कार समारंभाच्या अध्यक्ष स्थानावरून बोलत होत्या.

सहाय्यक आयुक्त समाज कल्याण डॉ. मंगेश वानखडे, जिल्हा परिषद समाज कल्याण अधिकारी संजय गणविर, प्रा.डॉ. सविता बेदरकर, प्राचार्य खुशाल कटरे आदिवासी विद्यालय खजरी आदी यावेळी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन करून करण्यात आली. आरक्षणाचे जनक राजश्री शाहू महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पमाला अर्पण करून, जोतीराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांना अभिवादन करण्यात आले. यानंतर बारावी व दहावी या बोर्डाच्या परिक्षेत प्रावीण्य मिळविलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यात शासकीय निवासी शाळा डव्वा येथील सेजल इंदूरकर, भैरवी उंदीरवाडे, सानिया मेश्राम, श्रेया लांडगे, तर मुरीचे दिक्षित सहारे, गौरव गजभिये, पियुष टेंभुर्णे, सरांडीचे कल्याणी भालेराव, आकांक्षा गौर, प्रिया उके आणि जिल्ह्यातील प्रथम अमन अग्रवाल, कैफ अन्सारी, मोहित भाववानी, अश्विन फुल्लुके, प्रांजली बहेकार, अश्विनी बिसेन, प्रेरणा बिसेन, तुषार ठाकरे या गुणवंत विद्यार्थ्यांचा शाल सन्मानपत्र श्रीफळ व रोपटे देऊन सन्मानित करण्यात आले.

सदर कार्यक्रम हे सामजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग समाज कल्याण कार्यालय डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन या ठिकाणी पार पडला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. मंगेश वानखडे यांनी केले. संचालन आशिष जांभूळकर यांनी तर आभार शिक्षक बगमारे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी समाज कल्याण कार्यालय अधिकारी व कर्मचारी वृंद तसेच तिन्ही निवासी शाळातील शिक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## ग्रामपंचायत कार्यालय वडेगाव/बंध्या.
### पंचायत समिती अर्जुनी/मोरगाव, जिल्हा परिषद गोंदिया

### निविदा सुचना

निविदा क्र.१ जा.क्र.-१२५, ग्रा.पं.वडेगाव/बंध्या, दिनांक २९/०६/२०२२

ग्रामपंचायत वडेगाव/बंध्या. पंचायत समिती अर्जुनी/मोर. जिल्हा परिषद गोंदिया येथे १५ वा वित्त आयोग अंतर्गत खालील विवरणातील कामाचे बांधकामाची ई-निविदा महाराष्ट्र बांधकाम विभागाकडे यथायोग्य श्रेणीत पंजीबद्ध असलेल्या कंत्राटदाराकडून शेकडावार ऑफलाईन पद्धतीने मागविण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नाव | कामाचे सांकेतांक क्र. | कामाची अंदाजपत्रकीय रक्कम | निविदा फार्मची किमत | अनामत रक्कम | काम पूर्ण करण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|
| ३ | सिमेंट कांक्रेट नाली बांधकाम करणे दाजीबा लोहंबरे ते ज्ञानेश्वर गोटेफोडे यांचे घरापर्यंत | ४०३३३०१० | ३०००००/- | ५००रू | ३०००/- | ६ महीणे |

१) वरील कामाचे निविदा फार्म दिनांक ३०/०६/२०२२ ला सकाळी १०.०० वाजे पासुन ते दिनांक ०६/०७/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय वडेगाव/बंध्या येथे कार्यालयीन वेळेत निविदा फार्म विक्री करण्यात येईल व निविदा फार्म विक्री केल्या नंतर पावती मिळेल.

२) सदर कामाच्या निविदा मोहरबंद लिफाफ्यात आवश्यक त्या कागदपत्रासह दिनांक ३०/०६/२०२२ ला सकाळी १०.०० वाजे पासुन ते दिनांक ०६/०७/२०२२ ला सायंकाळी ५.०० वाजे पर्यंत (सुट्टीचे दिवस वगळून) या कालावधीत ग्रामपंचायत कार्यालय वडेगाव/बंध्या येथे स्विकारण्यात येईल तसेच अनामत रक्कम भरल्याची पावती मिळेल.

३) मोहरबंद निविदा शक्य झाल्यास ग्रामपंचायत वडेगाव/बंध्या येथे मासीक सभेत उघडण्यात येईल.

४) सदर कामाची तपशिलवार संपुर्ण माहिती अटी शर्तीसह ग्रामपंचायतच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेली आहे.

**ग्रामसेवक**
ग्रामपंचायत वडेगाव/बंध्या

**सरपंच**
ग्रामपंचायत वडेगाव/बंध्या

# वसतिगृहात १९ वर्षीय विद्यार्थिनीची गळफास घेऊन आत्महत्या

**गोंदिया:-** स्थानिक मामा चौक येथील आदिवासी मुलींच्या वसतीगृहात एका विद्यार्थिनीने गळफास घेवून आत्महत्या केली. या घटनेमुळे वसतीगृहात एकच खळबळ उडाली. ही घटना (ता.२५) दुपारदरम्यान उघडकीस आली. वर्षा कुवरलाल मसे (१९) रा.नवरगाव असे आत्महत्या केलेल्या विद्यार्थिनीचे नाव आहे. उल्लेखनिय असे की, वर्षा मसे हिने काल आपल्या मैत्रिणीसोबत वाढदिवस साजरा केला होता.



स्थानिक मामा चौक येथील आदिवासी मुलींच्या वसतीगृहात नवरगाव येथील वर्षा कुंवरलाल मसे ही विद्यार्थिनी ४ वर्षापासून राहून शिक्षण घेत होती. (ता.२४) वर्षाचा वाढदिवस होता. या निमित्त तिने वसतीगृहातील मैत्रिणीसोबत वाढदिवस साजरा केला. (ता.२५) सकाळी वसतीगृहातील विद्यार्थिनी परिक्षा देण्यासाठी बाहेर पडल्या. दरम्यान वर्षा ही वसतीगृहाच्या एका खोलीत होती. विद्यार्थिनी परीक्षा देवून वसतीगृहात परत आल्यावर खोलीचे दार बंद दिसून आले. दरम्यान विद्यार्थिनींनी दार ठोठावून वर्षाला हाक दिली. मात्र खोलीतून कसलाही मिळाला नाही. यामुळे विद्यार्थिनींनी वार्डनला याची माहिती दिली. वार्डन देखील अनेक प्रयत्न केले मात्र कसलाही प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे दार तोडून खोलीत प्रवेश केला असता वर्षा मसे ही फासावर टांगलेली आढळली. यावरून वर्षाने आत्महत्या केल्याची बाब समोर आली. वर्षाच्या आत्महत्येचे कारण अस्पष्ट आहे. तर दुसरीकडे या घटनेची माहिती मिळताच तिच्या कुटूंबियांनी वसतीगृह गाठून हंबरडा फोडला. या घटनेमुळे वसतीगृहात एकच खळबळ उडाली आहे. या घटनेची नोंद शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. वर्षाने आत्महत्या का केली असावी? असा प्रश्न तिच्या मैत्रिणीपुढेही निर्माण झाला आहे.

## शिक्षक पतसंस्थेचे माजी अध्यक्ष शेषराव येळेकर यांचे निधन

**गोरेगावः-** गोंदिया जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष व गोरेगाव पंचायत समितींतर्गत येत असलेल्या बबई केंद्रांचे माजी केंद्रप्रमुख शेषराव शामराव येळेकर यांचे २७ जूनच्या रात्री १० वाजेच्या सुमारास अपघाती निधन झाले.त्यांच्या निधनाने शिक्षक जगतात शोककळा पसरली असून त्यांच्या मागे पत्नी, मुले मुली नातवंड असा आप्तपरिवार आहे. त्यांच्यावर २८ जून रोजी गोरेगाव येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले.



# महालगाव आंदोलनप्रकरणात १९ जण कारागृहात

**तिरोडा:-** धापेवाडा मार्गावर महालगाव-मुरदाडा शिवारात १५ जून रोजी अवैधरित्या रेती वाहून नेणाऱ्या टिप्पर व ट्रॅक्टरमध्ये धडक झाली होती. या अपघातात दोन मजुरांचा मृत्यू व तिघे गंभीर जखमी झाले होते. या घटनेनंतर संतप्त जमावाने टिप्परला जाळून दुसऱ्या दिवशी चक्काजाम आंदोलन केले. या आंदोलनादरम्यान पोलिस व ग्रामस्थांमध्ये संघर्ष झाल्याने काही पोलिस कर्मचारी जखमी झाले होते.दरम्यान पोलिसांवर हल्ला प्रकरणी २२ जून रोजी १९ जणांना ताब्यात घेतले. यात पुरुषोत्तम नागपुरे, शेषराव नागपुरे, अंकूश बंभारे, अनिल आगासे, जियालाल नागपुरे, प्रमेल नैकाने, राकेश मस्करे, दिनेश मस्करे, राजेश नागपुरे, छोटेलाल नागपुरे, योगेश नैकाने, विनोद नागपुरे, राजू आगासे, यशवंतराव आगासे,मनोज नागपुरे, शैलेश नागपुरे शैलेश सीमा नागपुरे व नितीन खतवार यांना ताब्यात घेतले. दरम्यान,२३ जून रोजी न्यायालयाने त्यांना न्यायालयीन कोठडी ठोठावली असून त्यांची रवानागी भंडारा कारागृहात करण्यात आली आहे. पुढील तपास दवनीवाडा पोलिस करीत आहे.

# भारतीय संविधानामुळेच देशात राष्ट्रवादाची संकल्पना रुजली

## ■ ॲड.सीमा कुशवाह यांचे प्रतिपादन ■ रजेगावात छत्रपती शाहू महाराज जयंती उत्साहात

**गोंदिया::-** नागपूरचा राष्ट्रीय स्वयं सेवक संघ हा राष्ट्रवाद निर्माण करण्याच्या निव्वळ बढाया मारतो,पण भारत देशात राष्ट्रवादाची संकल्पना भारतीय राज्य घटनेने रुजविली आहे,अशी ग्वाही, सर्वोच्च न्यायालयाच्या वकील सीमा समृद्धी कुशवाह यांनी दिली. रजेगाव येथे आयोजित छत्रपती शाहू महाराजांच्या जयंतीदिनी त्या प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नागपूरचे उपायुक्त धनंजय वंजारी हे होते. मंचावर ॲड स्वयं आंबेडकर, शिक्षणाधिकारी गजभिये, श्रीमती सविता बेदरकर, जिल्हा संख्यिकी अधिकारी श्री राऊत, जिल्हा सहकार निबंधक शुद्धोधन कांबळे,आदि मान्यवर उपस्थित होते.




ॲड. कुशवाह पुढे बोलताना म्हणाल्या की,भारतीय संविधानाने व्यक्तीचे मानवीय मूल्य जोपासले आहे. जी प्रस्थापित समाज व्यवस्था बहुजनांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा प्रयत्न करते, तो कसला राष्ट्रवाद आहे असा प्रश्न त्यांनी केला. राष्ट्रसंघाच्या यादीत भारत अत्यंत खालच्या क्रमांकावर आहे. बहुजन समाज शिक्षनापासून वंचित आहे. येथील प्रसार माध्यम मनुवाद्यांचे बाहुले बनले आहेत. परिणामी आम्ही अधिकार वंचित झालो आहोत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना देशातील समाजव्यवस्थेची जाणीव होती, ते संविधान लिहिण्यास सक्षम आहेत याची जाणीव भारतीय पुढाऱ्यांना होती म्हणूनच त्यांनी बाबासाहेबांना संविधान लिहिण्यासाठी विनंती केली असे त्या म्हणाल्या. ज्यांनी आम्हाला शूद्र म्हणून आमच्याशी भेदाभेद केले त्यांनी आमची माफी मागावी.

लोकसंख्याने तीन टक्के असणाऱ्या समाजाच्या महिलांनी कधीही शिक्षण मिळण्यासाठी आंदोलन केलं नाही पण त्या शिक्षित आहेत. आमचा अधिकार हिसकावू पाहणाऱ्यांना आमचा अधिकार हिसकावू देणार नाही, परंतु आपल्या मुलाबाळांच्या भविष्यासाठी आम्हाला लढाई लढावी लागेल याची जाणीव आपण ठेवावी.ॲड कुशवाह म्हणाल्या की आमच्या प्रत्येकाकडे असणाऱ्या इलेक्ट्रॉनिक माध्यमामुळे आम्ही खूप मोठी क्रांती करू शकतो असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. त्यांनी कांशीराम साहेबांचे उदाहरण देऊन सांगितलं की वैक्तिक हित बाजूला सारून समाजहीत जोपासल्यामुळे सरकार निर्माण करता येतं, परंतु आम्ही विखूरल्या अवस्थेत असल्यामुळे आम्ही सत्तेपासून वंचित आहोत यावर त्यांनी दुःख व्यक्त केलं. तुम्हा सर्वांच्या एकजुटीमुळेच आणि आंदोलनामुळेच एससी एसटी ॲक्ट शक्तिशाली झाला असे त्यांनी सांगितले.

महिलांना संबोधित करताना ॲड.कुशवाह यांनी सांगितलं की मंगळसूत्र, जोडवे, आणि पायातील पैंजण हे सगळेच महिलांच्या बेड्या आहेत म्हणून महिलांनी शिक्षण घ्यावे असे आवाहन त्यांनी केलं. त्यांनी खाजगी क्षेत्रात आरक्षण लागू करण्याची जोरदार मागणी केली. यावेळी ॲड स्वयं आंबेडकर, उपायुक्त वंजारी, सविता बेदरकर आणि ओबीसी संघटनेचे श्री कटरे यांनी मार्गदर्शन केलं. हा कार्यक्रम फुले, शाहू, बिरसा, आंबेडकर विचारमंचाच्या विद्यमाने आयोजित करण्यात आला.

सडक अर्जुनी तालुक्यातील जांभळी येथील रावण डॅन्स ग्रुपने सादर केलेल्या पारंपरिक गोंडी नृत्याने दर्शक मंत्रमुग्ध झाले. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, छत्रपती शाहू महाराज, जणनायक बिरसा मुंडा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पेरियार रामासामी नायकर, साहेब कांशीराम, राष्ट्रामाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीआई फुले यांच्या छायाचित्रांना माल्यार्पण करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. छत्रपती शाहू महाराजांची जयंती दिवाळी प्रमाणे करावी अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा होती ती इच्छापूर्ती करण्याचे काम रजेगाव इथं झाले आहे, अशी चर्चा लोकांमध्ये होती.ॲड कुशवाह यांच्या हस्ते गोंडीनृत्य संचालकांना शाल श्रीफळ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. बालाघाट येथील प्रकाश सागर यांच्या बोधिसत्व ऑर्केस्ट्राने सादर केलेलं छत्रपती शाहू महाराजांवरील गाणं "आरक्षण के जनक तुम्ही हो, हमारा नमन तुम्हे महाराज" यामुळे महापुरुषांच्या कार्याची महती लोकांना कळाली. कार्यक्रमाचे संचालन सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजेंद्र मेश्राम यांनी तर आभार शिक्षक रामभगत पाचे यांनी मानलं.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सोमेंद्र डहाट, रक्षित विद्रोही, तसेच गोंदिया,काटी,बिरसोला,बघोली, रजेगाव येथील सामाजिक कार्यकर्त्यांनी सहकार्य केल.




# महाज्योती विद्यार्थ्यांना टॅब कधी देणार!

## ऑनलाईन क्लास ६ महिण्यापासून सुरू पण जेईई निट प्रशिक्षणार्थींना टॅबचीच प्रतिक्षा!

**गोंदिया:** महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था महाज्योतीने जेईई आणि नीटचे ऑनलाइन कोचिंग तीन महिन्यांपासून सुरू केले. पण, त्यासाठी आवश्यक टॅब आणि इंटरनेट डेटा उपलब्ध न केल्याने ग्रामीण भागातील तसेच गरीब विद्याथी या नि:शुल्क कोचिंगपासून वंचित राहत आहेत.

महाज्योतीच्या वतीने ओबीसी, व्हीजेएनटी, एसबीसी विद्यार्थ्यांसाठी जेईई-नीट एमएचसीईटी स्पर्धा पूर्व ऑनलाइन प्रशिक्षण सुरू केले आहे. या ऑनलाइन कोचिंगला ७ डिसेंबर २०२१ पासून सुरुवात झाली. वास्तविक ऑललाइन क्लासेस जून-जुलैमध्ये सुरू व्हायला हवे होते. ते तीन-सहा महिने विलंबाने सुरू करण्यात आले. यासाठी राज्यातील विज्ञान शाखेतील १२ हजार विद्यार्थ्यांनी अर्ज केले. यात ग्रामीण भागातील तसेच गरीब विद्यार्थ्यांची मोठी संख्या आहे. यातील अनेकांकडे भ्रमणध्वनी संच नाही तसेच ५ जीबी डेटा एका दिवशी वापरण्यासाठीचा खर्चही ते उचलू शकत नाही. त्यामुळे हजारो विद्यार्थी वर्ग करू शकत नसल्याचे दिसून आले आहे. टॅब आणि इंटरनेट डेटा नसल्याने महाज्योतीचे ऑनलाइन प्रशिक्षण कूचकामी ठरत आहे, असे ओबीसी अधिकार मंच, स्टुडंट्स राइट्स असोसिएशन ऑफ इंडिया संघटनेने म्हटले आहे.

महाज्योतीचे अध्यक्ष व मंत्री विजय वडेट्टीवार यांनी संचालकांच्या पुढाकाराने गरीब ग्रामीण विद्यार्थ्यांनाही दर्जेदार ऑनलाइन कोचिंगचे वर्ग महाज्योतीच्या वतीने सुरू केले आहेत.

दहावीत ७० टक्के व ग्रामीण शाळांतील ६० टक्के गुण घेतलेल्या व वर्ग ११ वी मध्ये विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना जेईई- नीट स्पर्धा परीक्षेसाठी मोफत ऑनलाइन क्लास व त्यासाठी विद्यार्थ्यांना मोफत ब्रँडेड कंपनीचा टॅब देण्याची व त्यासोबत दररोजचा सहा जीबी डेटा मोफत देण्याची महाज्योतीची योजना आहे.

**संचालक मंडळाच्या बोर्ड मेंबर बैटकीत टँब खरेदीला मंजुरी दिली असून खरेदी प्रकियेला सुरवात झाली आहे.मार्च अखेरपर्यत विद्यार्थ्याना टँब मिळायला हवे होते,मात्र यात उशीर झाला असला तरी लवकरच टॅब हाती पडणार आहेत.**

**लक्ष्मण वडले संचालक महाज्योती**

यासाठी महाज्योतीकडे अर्ज करण्यासाठी महाज्योतीने ३० नोव्हेंबर २०२१ पर्यंत ऑनलाइन अर्ज मागितले. त्यात १२ हजार अर्ज मिळाले.त्यापैकी ९ हजार विद्यार्थ्यांची निवड झाल्याचे सांगितले जात आहे.त्यातच २०२४ परिक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांकडून टॅबसाठी अर्ज मागवायला सुरवात झालेली असताना २०२३ मध्ये परिक्षा देणारे विद्यार्थी मात्र अद्यापही वंचित आहेत.

महाज्योतीच्या संचालक मंडळाने पात्र विद्यार्थ्यांना ऑनलाइन प्रशिक्षण व मोफत टॅब घेण्याचा निर्णय घेतला. संचालक मंडळाने मंजूर केल्यानंतरही महाज्योतीचे प्रशासन टॅब आणि डेटा पुरवण्यास दिरंगाई करीत आहेत.अर्धे शैक्षणिक वर्ष लोटूनही टॅब खरेदीची न झालेल्या प्रकियेवरुन ओबीसी मंत्रालयाच्या कारभाराचे दर्शन होते.

ग्रामीण, गरीब विद्यार्थ्यांचा विचार करून, नीट- जेईई एमएच २०२३ च्या प्रशिक्षणाथी विद्यार्थ्यांना विचार करून, टॅब व इंटरनेट देण्याचा विचार त्वरित करावा, अशी अनेक विद्यार्थी-विद्यार्थिनींनी मागणी केली आहे.

# शासकीय यंत्रणांनी गुणात्मक काम करण्यावर भर द्यावा-पालक सचिव श्याम तागडे




**गोंदिया :** गोंदिया जिल्हा हा धान उत्पादक जिल्हा आहे. राज्याच्या अतिपूर्वेकडे वसलेल्या या जिल्ह्यात काम करण्यासाठी भरपूर वाव आहे. यंत्रणांनी केवळ भौतिक उद्दिष्टपूर्तीसाठी काम न करता गुणात्मक काम करण्यावर भर द्यावा असे आवाहन प्रकल्प संचालक, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प तथा पालक सचिव गोंदिया जिल्हा श्याम तागडे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.

जिल्हाधिकारी नयना गुंडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील, अपर जिल्हाधिकारी राजेश खवले, उपवनसंरक्षक कुलराज सिंह, निवासी उपजिल्हाधिकारी जयराम देशपांडे, जिल्हा नियोजन अधिकारी कावेरी नाखले व विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते. या बैठकीत पालक सचिवांनी विविध विभागाचा आढावा घेतला.

अनुसूचित जमाती व इतर पारंपारिक वन निवासी वन हक्क दावे प्राधान्याने निकाली काढण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. जिल्हा प्रशासनाने विशेष लक्ष देऊन हा विषय मार्गी लावावा असे ते म्हणाले. घरकुल योजनेबाबत बोलताना तागडे म्हणाले की, गरजू व वंचित व्यक्तीला घरकुलाचा लाभ प्राधान्याने मिळायला हवा. ग्राम पंचायत स्तरावर पात्र लाभार्थ्यांना घरकुलाचा लाभ देतांना भेदभाव होत असल्याच्या तक्रारी असून याबाबत तपासणी करून घ्यावी असे त्यांनी सुचविले.

जिल्ह्यात कोविड स्थिती नियंत्रणात असली तरी दक्षता घेण्यात यावी असे सांगून श्री. तागडे म्हणाले की, लसीकरणाला गती देण्यात यावी. जिल्ह्यात पहिला डोस घेणाऱ्यांची संख्या १० लाख ७४ हजार २०९, दुसरा डोस घेणाऱ्यांची संख्या ८ लाख ७३ हजार २९७, बूस्टर डोस घेणाऱ्याची संख्या २७ हजार ४७६ एवढी आहे. "हर घर दस्तक' या अभियानातून प्रत्येक लाभार्थ्यांना लस देण्याचे उद्दिष्ट असल्याचे आरोग्य विभागाने सांगितले. पावसाळ्यात साथरोग वाढण्याची शक्यता असून या दृष्टीने उपाययोजना करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

खरीप व रब्बी हंगाम सन २०२१-२२ मध्ये ५७ लाख २८ हजार ८३४ क्विंटल धान खरेदी करण्यात आला असून त्यापैकी ४१ लाख १७ हजार ६६४ क्विंटल धानाची भरडाई झाल्याची माहिती यावेळी देण्यात आली. जिल्हा नियोजन सर्वसाधारण, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती उपयोजना ता तिन्ही मिळून मागील आर्थिक वर्षात २५४ कोटींचा नियतव्यय मंजूर होता. तो शंभर टक्के खर्ची पडला असल्याचे नियोजन विभागाने सांगितले. गोंदिया शहरातील पाणी पुरवठा योजना १९७८ ची असून अमृत योजनेत नवीन पाणी पुरवठा योजना घेण्यात आल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीत घरकुल योजना, पाणी पुरवठा योजना, कोविड, धान खरेदी, जिल्हा नियोजन, नगर विकास, विद्युत विभाग, मत्स्यव्यवसाय, पशुसंवर्धन या सह विविध विभागाचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्याच्या विस्तृत माहितीचे सादरीकरण अपर जिल्हाधिकारी राजेश खवले यांनी केले.

### गृहभेट उपक्रमाचे कौतूक

**शासकीय योजनांची माहिती नसलेल्या दुर्गम भागातील वृद्ध तसेच दिव्यांग लाभार्थ्यांना 'गृहभेट आपुलकीची' या उपक्रमाद्वारे महसूल विभाग स्वतः अर्ज भरून देऊन लाभ देतो. हा उपक्रम नाविन्यपूर्ण असून यात आतापर्यंत ३२८० लाभार्थ्यांना लाभ देण्यात आला आहे. या उपक्रमाचे पालक सचिव श्याम तागडे यांनी कौतूक केले. अन्य जिल्ह्यात हा उपक्रम अनुकरणीय असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.**

# जि.प.व पं.स.कर्मचारी पतसंस्थेच्या निवडणुकीत एकता पॅनलचे उमेदवार रिंगणात



**गोंदिया:** गोंदिया जिल्हा परिषद, पंचायत समिती कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या होऊ घातलेल्या निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला असून उमेदवारी अर्ज भरण्याच्या अखेरच्या दिवशी एकता पॅनलच्या २१ उमेदवारांनी आपले उमेदवारी अर्ज जिल्हा निबंधक व निवडणुक निर्णय अधिकारी यांच्याकडे सादर केले. यावेळी एकता पॅनलच्या समर्थनात जिल्ह्यातील ३०० वर सभासदांनी उपस्थिती दर्शविली होती. या पतसंस्थेवर सुरुवातीपासूनच एकता पॅनेचचे वर्चस्व आहे.

यावेळी सुद्धा एकता पॅनलचे पतसंस्था आपल्या ताब्यात कशी राहिल याची व्युवहरचना आखायला सुरुवात केली आहे. या निवडणुकीसाठी एकता पॅनलच्या वतीने सचिव पदाकरिता गुणवंत ठाकुर, अनु. जमाती गटून अजय वासनिक, विजाभज/विमाप्र गटातून अमोल डेकाटे, इतर मागासवर्ग गटातून संजय बनकर, महिला प्रतिनिधी मंजुषा चौधरी, माधुरी टेंभेरकर, रंजना रोकडे, वर्ग ४ महिला गटातून ममता कुंभलकर, वर्ग ४ गटातून नामदेव मेश्राम, पंचायत समिती गोंदिया गटातून रविकुमार पटले, महेंद्र खोब्रागडे, पंचायत समिती तिरोडा गटातून अनमोल चव्हाण, गजानन माहुरे, आमगाव महेश पटले, सालेकसा-अशोक फुंडे,देवरी-आत्माराम वंजारी, अर्जुनी मोरगाव-मुनेशगिरी भारद्वाज, सडक अर्जुनी: किशोर बन्सोड, गोरेगाव-शशीकांत बावनकर व जिल्हा परिषद गटातून अनमोल मेश्राम, चंद्रकांत धपाडे यांचे उमेदवारी अर्ज दाखल झाले आहेत.

# ३८ दिव्यांगांना प्रेशरकुमार वाटप



**गोंदिया:** जवळील कारंजा येथे ग्रामपंचायत निधीतून ३८ दिव्यांगांना माजी आमदार गोपालदास अग्रवाल यांच्या हस्ते प्रेशरकुकर वाटप करण्यात आले. तसेच ई-रिक्षाचे लोकार्पण करण्यात आले.


याप्रसंगी जि.प.सभापती संजय टेंभरे, पं.स.सदस्य योगराज उपराडे, माजी पं.स.सभापती स्नेहा गौतम, माजी पं.स.सभापती माधुरी हरिणखेडे, भाजप तालुकाध्यक्ष धनलाल ठाकरे, माजी जि.प.सदस्य राजेश चतुर, सरपंच धनवंता उपराडे, उपसरपंच महेंद्र शहारे, ग्रा.पं.सदस्य लिखराम बनोटे, महादेव ताराम, गजानन नागपुरे, प्रकाश ब्रम्हपुरे, कपुरचंद रंगारी, भाविका रंगारी, रेवंता मडावी, गीता उईके, वनमाला बडोले, सुनिता नागपुरे, सुनिता उके, शकुनबाई कोटवाल, कारु रहमतकर, माजी उपसरपंच मारोती भिमटे, शिवलाल ढेकवार, टेकचंद बलभद्रे, गुलाब उपराडे, नवनीत शेंदरे, ताईमलाल ताराम, उमेश चुलपार, पोलीस पाटील अल्का रंगारी, सेवनबाई उईके, साधना बन्सोड, माया ठाकरे, सविता तवाडे, विजय वाघाडे, चैताम ताराम, लोकेश उपराडे, दुर्गेश राऊत, राहूल कुसराम, हितेश मेश्राम, कृष्णा खांडवाये, शिवप्रसाद उपराडे, मधू नागपुरे, ओमप्रकाश ताराम, ग्रामविकास अधिकारी आर.एन. बहेकार, मुकेश उपराडे, नरेश सिलोके, विक्रांत रंगारी, शिवराम दमाहे आदि उपस्थित होते.

### कृषी संजीवनी सप्ताहाचा शुभारंभ

चिचगड-महाराष्ट्र शासन कृषी विभाग तालुका कृषी अधिकारी कार्यालय देवरीच्या वतीने कृषी संजीवनी सप्ताह कार्यक्रमाचे शुभारंभ तालुक्यातील मुल्ला येथील ग्राम पंचायत परिसरात करण्यात आले.

# पार्किंग प्लाझा ठरु पाहतो निकामीश

**गोंदिया:** शहरातील पार्किंग व्यवस्था सधारण्यासाठी नपतर्फे ७ कोटीहून अधिक रुपयांचा निधी खर्च करुन वाहनतळ उभारण्यात आले. अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेल्या इमारतीत शेकडो वाहने उभी ठेवण्याची सोय करण्यात आली. तर नुकतेच या वाहनतळाचे उद्घाटन करण्यात आले. असे असले तरी शहरातील पार्किंग व्यवस्थेत कुठलीही सुधारणा झाली नाही. त्यामुळे शहरात वाहतुकीची कोंडी होणे ही नित्याची बाब झाली आहे. असेच दृश्य मंगळवार (दि.२८) रोजी शहरातील नेहरु चौक ते गोरेलाल चौक मार्गावर दिसून आले. त्यामुळे तयार करण्यात आलेला पार्किंग प्लाझा निकामी ठरु पाहत असल्याचे दिसून येत आहे.



गोंदिया शहर जिल्हा मुख्यालय असल्याने दरदिवशी हजारो नागरिक, लघु व्यवसायीक, भाजीपाला विक्रेते शहरात दाखल होतात. व्यावसायिक सोयीनुसार व्यवसाय करत असले तरी एकाही व्यावसायिकाने खरेदीदारांच्या सोयीनुसार पार्किंगची व्यवस्था केलेली नाही. त्यामुळे जीवनावश्यक वस्तूंच्या खरेदीसाठी येणारे ग्राहक दुकानांसमोर रस्त्याच्या कडेला वाहने उभी करतात. बेशिस्त वाहनांमुळे वाहतूक विस्कळीत होत आहे. रस्त्यांवर नेहमी वाहतुकीची कोंडी होत असल्याने नागरिकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. एवढेच नाही तर वाहन चोरीच्या अनेक घटनाही समोर आल्या आहेत. शहरात दिवसेंदिवस निर्माण होत असलेल्या पार्किंगच्या भीषण समस्येला दूर करण्यासाठी आणि वाहनचोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक नगर परिषदेतर्फे ७ कोटीहून अधिक खर्च करुन पार्किंग प्लाझाची बहुमजली इमारत बांधण्यात आली. इमारतीचे बांधकाम आधुनिक पद्धतीने करण्यात आले. दुचाकी, तीन चाकी आणि चारचाकी वाहनांसाठी पार्किंगची सोय करण्यात आली. गेली तीन वर्षे नगरवासी इमारत कधी सुरु होणार अशी वाट पाहत होते. त्यात काही दिवसांपुर्वी इमारतीचे उद्घाटन करण्यात आले. मात्र वाहन ठेवण्याच्या स्थितीत कोणताही बदल झालेला नाही. शहरातील प्रमुख रस्ते दररोज जाम होतात. वाहतुकीदरम्यान पादचारी व वाहनचालकांना त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे कोट्यावधी रुपये खर्चून तयार करण्यात आलेला पार्किंग प्लाझा शोभेची वस्तू ठरत आहे.

# जिल्हा परिषदेच्या ३७३ शाळांमध्येच पिण्याचे शुद्ध पाणी

**गोंदिया:** जिल्हा परिषद शाळेचे नाव घेताच भौतिक सुविधांची समस्या डोळ्यासमोर येते. ते गोंदिया जिल्हा परिषदेच्या शाळाही याला अपवाद नाहीत. गोंदियात जिल्हा परिषदेच्या १ ते ८ वीपर्यंतच्या १ हजार ३९ शाळा आहेत. त्यापैकी ३७३ शाळांमध्ये विद्यार्थ्यांसाठी शुद्ध पिण्याच्या पाण्याची सुविधा उपलब्ध आहे. काही शाळांमधील विद्यार्थ्यांना विहीर, नळ व हातपंपच्या पाण्यावरच आपलीतहान भागवावी लागत आहे. शासनाचा पुरस्कार मिळालेली भागी गावाच्या शाळेची देखील अशीच अवस्था आहे. एकीकडे शाळा डिजिटल करण्याचा घाट घातला जात आहे तर दुसरीकडे विद्यार्थ्यांना साधेपिण्याचे शुद्ध पाणी देखील मिळत नाही, अशी अवस्था बहुतेकते जिल्हा परिषद शाळांची आहे.



गोंदिया जिल्ह्यामध्ये जिल्हा परिषद प्राथमिक विभागाच्या इयत्ता पहिली ते आठवीपर्यंत १ हजार ३९ शाळा सुरूआहेत. या शाळांमध्ये दीड लाखांपेक्षा जास्त गरी ब व सामान्य कुटुंबांतील मुले शिक्षण घेत आहेत. समग्र शिक्षा अभियानामार्फत विद्यार्थ्यांना दुपारचे जेवण दिले जाते. मात्र, जेवणासोबत पिण्याच्या शुध्द पाण्याची सोय उपलब्ध करून देण्यास प्रशासन अपयशी ठरले आहे. शिक्षण अधि ऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार १ हजार ३९ शाळांपैकी फक्त ३७३ शाळांमध्ये शुद्ध पाण्याची पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. इतर विद्यार्थ्यांना शुद्ध पाण्यापासून वंचित रहावे लागतआहे. अशुद्ध पाणी पिल्याने जलजन्य आजाराची शक्यता नाकारता येत नाही. ३७३ शाळांमध्ये शुद्ध पाण्याचा पुरवठा होतो. ६६६ शाळांमध्ये विद्यार्थ्यांना पिण्याचे पाणी नळ, हातपंप व विहीरीच्या माध्यमातून मिळते. ते म्हणजेच निम्याहून अधिक शाळां मध्ये शुद्ध पाणी मिळण्याची शाश्वती नाही. २९ जूनपासून जिल्हा परिषदेच्या शाळा भरणार आहेत. त्यातच आता पावसाळा सुरूझाला आहे.

पावसाळ्याच्या दिवसांत बहुतांश आजार दुषित पाण्यामुळे होतात. त्यामुळे शाळा सुरू झाल्यानंतर अशुद्ध पाण्यावरच विद्यार्थ्यांना तहान भागवावी लागणार आहे . गेल्या अनेक वर्षांपासून शाळांमधील अशुद्ध पाण्याचा विषय रेंगाळलेला आहे. मात्र त्याकडे लक्ष देण्याची तसदीना लोकप्रतिनिधी, अधिकारी घेताना दिसत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्याच्या आरोग्याचा विषय ऐरणीवर आला आहे. शिक्षणावर ग्रामपंचायतींना वित्त आयोगाकडून मिळालेल्या निधीतून ५ टक्के खर्च करण्याचे अधिकार दिले आहे. ग्रामपंचायतींनी आणि जिल्हा परिषदेने संबंधित शाळांमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी पालक, विद्यार्थी करीत आहेत

# स्पर्धा परीक्षेसाठी गावातच मिळणार पुस्तके

**गोंदिया:** ग्रामीण भागातील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना ग्रामीण भागात पुस्तके उपलब्ध नसल्याने शहराकडे धाव घ्यावी लागत होती. यामुळे बरेच विद्यार्थी स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासापासून दूर होते. परंतु आता ही समस्या दूर झाली असून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना आता गावातील शाळा आणि महाविद्यालयात ही पुस्तके उपलब्ध करुन दिली जाणार आहे.

स्थानिक विकास आमदार निधीचा उपयोग शासकीय व स्थानिक स्वराज्य संस्थांतर्गत संचालित शाळा-महाविद्यालयांना डेस्क, बँच, वॉटर प्युरीफायर, वॉटर कुलर तसेच स्पर्धा परीक्षेची तयारी करण्यासाठी आवश्यक पुस्तकांसाठी व विविध शैक्षणिक कामासाठी खर्च करण्याची तरतूद नव्हती.

त्यामुळे आमदार निधी देण्यास तयार असताना सुद्धा केवळ याची तरतूद नसल्याने अडचण येत होती. ही समस्या लक्षात घेता आमदार विनोद अग्रवाल यांनी शासनाकडे पाठपुरावा करुन ही अट रद्द करण्याची मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार व शालेय शिक्षण मंत्री वर्षा गायकवाड यांच्याकडे केली होती. यानंतर शासनाने याला मंजूरी दिली आहे. त्यामुळे स्थानिक विकास आमदार निधीतून आता स्पर्धा परीक्षेची पुस्तके व इतर शैक्षणिक साहित्यासाठी निधी देता येणार आहे. यासाठी १० लाख रुपयांपर्यंतच्या निधीची मर्यादा ठरवून दिली आहे.




### यासाठी देता येणार आता निधी

**ग्रामपंचायत स्तरावर पाणीपुरवठा योजनेसाठी आरओ प्लांट लावणे, ग्रामपंचायत व तलाठी कार्यालयात वॉटर प्युरीफायर लावणे, तसेच ग्रामपंचायतला अंत्यसंस्कारासाठी शवपेटी उपलब्ध करुन देण्यासाठी १० लाख रुपयांपर्यंत निधी देता येणार आहे.**

**ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेची तयारी करण्याठी पुस्तके उपलब्ध करुन देता यावी. तसेच शाळांच्या विकासासाठी स्थानिक विकास आमदार निधीतून देता तावा यासाठी शासनाने मंजूरी द्यावी यासाठी सातत्याने पाठपुरावा केला होता. त्याला राज्य सरकारने मंजूरी दिल्याने विद्यार्थ्यांना दिलासा मिळाला आहे.**

**विनोद अग्रवाल, आमदार**

# प्लास्टिकमुक्त मोहीम एकसाथ फाऊंडेशनचा उपक्रम शहर स्वच्छतेचा ध्यास



**गोंदिया:-** शहराला प्लास्टिकमुक्त करून सुंदर आणि निरोगी बनविण्याचा ध्यास घेऊन पूर्णा पटेल यांच्या नेतृत्वात मुंबई येथील एकसाथ फाऊंडेशन माध्यमातून शहरात सुरु झालेली स्वच्छता मोहीम रामनगर परिसरात राबविण्यात आली. संपूर्ण रामनगर परिसरातील प्लास्टिक गोळा करण्यासोबतच नागरिकांशी संवाद साधत परिसर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.


रामनगर पोलीस ठाणे परिसरातून सुरु करण्यात आलेल्या स्वच्छता मोहिमेच्या वेळी गोंदिया शिक्षण संस्थाचे संचालक निखिल जैन, गोंदिया नगर परिषदेचे मुख्याधिकारी करण चव्हाण, एकसाथ फाऊंडेशन मुंबईचे दीपिका मिश्रा, संपूर्ण अर्थचे देवर्था बॅनजी, गोंदिया शिक्षण संस्था संचालित महाविद्यालयाचे प्राचार्य व प्राध्यापक, संस्कृती महिला मंडळाच्या सदस्य, गुजराती शाळेतील शिक्षक कर्मचारी, नगर परिषदेचे स्वच्छता कर्मचारी उपस्थित होते. पूर्णा पटेल यांच्या नेतृत्वात गोंदिया शहराला प्लास्टिक आणि कचरा मुक्त करण्याचा ध्यास घेऊन मुंबई येथील एकसाथ फाऊंडेशनच्या माध्यमातून ३ जून २०२२ रोजी गोंदिया शहरात स्वच्छता मोहीम सुरु करण्यात आली. सुरुवात मोक्षधाम आणि डम्पिंग यार्ड परिसरातून करण्यात आली. नंतर शहरातील बाजार परिसर व मुख्य रस्त्यावर स्वच्छता मोहीम राबवून नागरिकांना स्वच्छतेचा संदेश देण्यात आला. आज, २५ जून रोजी ही स्वच्छता मोहीम रामनगर परिसरात राबविण्यात आली. रामनगर बाजार चौक, रामनगर नगर परिषद शाळा, मनोहर कॉलोनी, धोटे प्रेस ते नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयापर्यंतचा संपूर्ण रामनगर परिसरातील प्लास्टिक गोळा करण्यात आले.

पुन्हा उपयोगात येणारे प्लास्टिक आणि उपयोगात न येणारे प्लास्टिक असे दोन प्रकारे प्लास्टिक गोळा करण्यात आले. या पूर्वी गोळा करण्यात आलेले प्लास्टिक येथून थेट चंद्रपूर येथील सिमेंट कारखान्यात वापरासाठी पाठविण्यात आले. या पुढेही गोळा करण्यात येणारे प्लास्टिक वापरात येणारे व वापरात न येणारे असे वेगळे करून चंद्रपूर येथील कारखान्यात पाठविण्यात येतील, असे या प्रसंगी पूर्णा पटेल व निखिल जैन यांनी सांगितले. आपले आरोग्य आपली जबाबदारी असून प्रत्येकाने स्वच्छता पाळल्यास आपला परिसर स्वच्छ राहील. प्रत्यकाने स्वतःची जबाबदारी म्हणून स्वच्छता पाळून परिसर स्वच्छ ठेवावा, असे आवाहन पूर्णा पटेल व निखिल जैन यांनी केले.

यावेळी प्राचार्य जिवानी, प्राचार्य निकोसे, प्रा. एजाज शेख, प्रा. भावेश जसानी, प्रा. परवीन कुमार, प्रा. बबन मेश्राम, प्रा. उर्विल पटेल, प्रा. योगेश बैस, प्रा. कदंबे, प्रा. पाटील, प्रा. तृप्ती पटेल, प्रा. कविता पटेल, प्राचार्या रिझवाना, रेणुका जडेजा, प्रा. नीलकंठ भेंडारकर, प्रा. प्रेम बसेने, प्रा. रवी रहांगडाले, शिवम अग्रवाल, रचित पटेल, आनंद मकवाना, वाजेद अली सय्यद, अमोल बेलगे, घनशाम गेडेकर, निधी शर्मा, दुर्गा येडे, गीता खिरेकर, मनोज पटले, नरेंद्र बेलगे यांच्यासह नटवरलाल माणिकलाल दलाल महाविद्यालयाचे एनसीसी व एनएसएस चे स्वयंसेवक, संस्कृती महिला मंडळाचे सदस्य, गुजराती शाळेचे शिक्षक कर्मचारी, नगर परिषदेच्या स्वच्छता विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# गोंदिया नगर परिषदेतील मिळकतीचे ड्रोनद्वारे मोजणी

**गोंदिया:-** महाराष्ट्र शासन, महसूल व वन विभाग यांचेकडील २७ जुलै २०२० रोजीचे शासन निर्णयानुसार गोंदिया शहराचे व गोंदिया शहर नगर परिषदेच्या हद्दीमध्ये काही गावांचा अंशत: समावेश करण्यात आला आहे. त्यामध्ये गोंदिया (बुज), गोंदिया खुर्द, कटंगीकला, कुडवा, नंगपूरा/मुरी, पिंडकेपार अशा एकूण ६ गावातील नगर परिषद हद्दीतील मिळकतीचे ड्रोनद्वारे मोजणी पुढील आठवड्यापासून करण्यात येणार आहे.



त्या अनुषंगाने जमाबंदी आयुक्त आणि भूमी अभिलेख (म.राज्य) पुणे यांचेकडील २७ एप्रिल २०२० रोजीचे पत्रानुसार पथदर्शी प्रकल्प खाजगी संस्थाकडून राज्यातील ५ नगर पालिका क्षेत्रातील पथदर्शी नगर/शहर भूमापन आधुनिक तंत्रज्ञान ड्रोनच्या सहाय्याने करावयाचे असून या कामी गोंदिया जिल्ह्यातील गोंदिया नगर परिषदेची निवड करण्यात आलेली आहे. सदर पथदर्शी प्रकल्पांतर्गत नगर परिषद हद्दीतील शहर भूमापन करण्यात येणार आहे. सदर शहर भूमापन केल्याने शासनाचे मालकीच्या मिळकतीचे संरक्षण होईल, मिळकतीचा विहीत परिमाणात नकाशा तयार होईल व सीमा निश्चित होतील. मिळकतीचे नेमके क्षेत्र किती आहे याची नोंद होईल. शहर वासियांचे नागरी हक्काचे संवर्धन होईल. शहराचे रस्ते, शासनाच्या मिळकती, नगर परिषदेतील खुल्या जागा, नाले इत्यादीच्या सीमा निश्चित होऊन अतिक्रमण रोखता येईल. मिळकत पत्रिका तयार झाल्यामुळे मालकी हक्काचे पुरावे प्राप्त होतील. मिळकत धारकांना घरावर कर्ज घेण्याची सुविधा उपलब्ध होईल. नगर परिषदेची कर आकारणी, बांधकाम परवानगी यासाठी अभिलेख व नकाशा उपलब्ध होईल.

तरी गोंदिया नगर परिषद हद्दीतील नागरिकांनी ड्रोन सर्व्हे करण्यापूर्वी आपल्या मिळकतीचे चुन्याचे/पेंटने सिमांकन करुन घ्यावे. सुरुवात होणाऱ्या सर्व्हेक्षण कामी नगर परिषद कर्मचारी व जनतेने स्वयंस्फुर्तीने सर्व्हे करणाऱ्या पथकांना सहकार्य करावे. असे आवाहन उप अधीक्षक भूमी अभिलेख गोंदिया व मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया यांचेद्वारे करण्यात येत आहे.